वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- मागील दि. १७/०७/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

ठराव / निर्णय :- दि. १७/०७/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कामय केलेल्या इतिवृत्ताचे वाचन करुन दुरुस्तीसह कायम करण्यात आले.

सुचक - प्रफुल्ल सोने

अनुमोदक - स्वाजित कवळी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ | सभा सुचना क्र. ११ | दिनांक : ३१/०८/२०२६

विषय :- प्रश्नोत्तरे.

अ.क्र.	सचिव कार्यालयास प्रश्न प्राप्त दिनांक	सदस्याचे संपूर्ण नाव व प्रभाग क्रमांक	प्रश्नाचे संक्षिप्त स्वरूप
१.	२४/०८/२०२६	श्री. हितेश नरेंद्र जाधव नगरसेवक प्रभाग क्र. ६-अ	महापालिकेच्या पाणीपुरवठा धोरण व नियोजनाबाबत.

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३ सभा सुचना क्र. ११ दिनांक : ३१/०८/२०२६

विषय :- शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.

ठराव/निर्णय :-

१. **मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी Suo-Moto रिट याचिका (सिव्हिल) क्र.9/2025 (Phalodi Accident-versus-National Highways Authority of India) with W.P. (C) No. 1100 / 2025 संदर्भात दिलेल्या निर्देशांची राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांनी अंमलबजावणी करण्याबाबत.**

शासान निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२७१/नवि-२० दिनांक १०/०८/२०२६.

२. **राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जुन्या इमारतींना Ease of Doing Business & Ease of Living Reform अंतर्गत Rainwater harvesting and Solid waste/ bio-sludge management करीता परवानगी देण्याची कार्य पध्दती.**

शासान निर्णय क्रमांक : रेवॉह-२०२५/प्र.क्र.२०/नवि-२० दिनांक १०/०८/२०२६.

वरिल शासकीय प्रत्र व्यवहाराची माहिती व प्रत प्राप्त झालेली आहेत असे एकमताने मान्य केले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- श्री.सुरेश ओंकार चव्हाण, सहा. फायरमन यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ई', नालासोपारा येथील आस्थापनेवरील श्री. सुरेश ओंकार चव्हाण, सहा. फायरमन यांनी दि. ०२/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

श्री. सुरेश ओंकार चव्हाण, यांची प्रशासकीय ठराव क्र. २३४ दि. ३०/११/१९९२ अन्वये सफाई कामगार या पदावर वेतनश्रेणी रु. ७५०-१२-८७० दरो १४-९५० नुसार त्यांची नेमणूक करण्यात आली होती. श्री. सुरेश ओंकार चव्हाण , यांना राज्य अग्निशमन केंद्र, सांताक्रुझ येथे दि. ४/७/१९९४ ते दि. ३०/९/१९९४ या कालावधीत पाठयक्रम प्रशिक्षण क्र. २० या प्रशिक्षणासाठी पुरस्कृत करण्यांत आलेले होते. या संस्थेकडील दि. ३०/९/१९९४ नुसार त्यांनी सदरचे प्रशिक्षण पूर्ण केलेले होते. त्याअनुषंगाने सर्व साधारण सभा दि. २८/२/१९९७ ठराव क्र.४३९ नुसार त्यांची दि. १/३/१९९७ पासून सहाय्यक फायरमन या मंजूर पदावर वेतन श्रेणी रू. ७७५-१२-९५५ दरो १५-१०३०-२०-११५० या वेतन श्रेणी मध्ये पदोन्नतीने नियुक्ती करणेत आलेली होती.

श्री. सुरेश ओंकार चव्हाण, सहा.फायरमन यांची नेमणूकीपासून प्रभाग समिती 'ई' नालासोपारा ते वसई विरार शहर महानगरपालिकेत ३३ वर्षे इतकी सेवा झालेली आहे. त्यांचे सद्याचे वय ५६ वर्षे असुन त्यांनी माझ्या घरगुती अडचणी करिता मला वसई विरार शहर महानगरपालिकेत काम करणे सध्या अशक्य होत आहे, कारण माझ्या पत्नीचे कॅन्सरचे ऑपरेशन झाले आहे. सेवा निवृत्ती हेाणेकामी मला अजून दोन वर्षे बाकी आहेत. तरी माझ्या अडचणी लक्षात घेवून माझी स्वेच्छानिवृत्ती मंजूर करावी हि नम्र विनंती असे नमुद केलेले आहे.

श्री. सुरेश ओंकार चव्हाण, सहा. फायरमन यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ तरतूदीनूसार

१. शासकीय कर्मचाऱ्याला त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल.
२. स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबद्दल पोटनियम (१) खाली दिलेली नोटीस, नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल . परंतू, उपरोक्त नोटीशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल असे नमूद आहे.

तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ मधील तरतूदी नूसार श्री.सुरेश ओंकार चव्हाण यांना दि.०२/०७/२०२६ पासून महानगरपालिका सेवेमधून स्वेच्छा सेवानिवृत्ती दिलेली असून, त्यांना सेवानिवृत्तीनंतर सर्व लाभ म्हणजेच सेवानिवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. सुरेश ओंकार चव्हाण, सहा. फायरमन यांनी दि. ०२/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) मधील तरतुदी नुसार दि.०२/०७/२०२६ रोजी मध्यान्हपूर्व महानगरपालिका सेवेतून दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्तीस व सेवानिवृत्तीनंतर सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील "अधिक्षक" संवर्गातील कर्मचाऱ्यांना "सहाय्यक आयुक्त" या पदावर पदोन्नती देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

नगरविकास विभागाकडील शासन निर्णय दि. ०९/०९/२०१४ अन्वये महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून त्यानुसार आस्थापनेवर "सहाय्यक आयुक्त" संवर्गाची एकूण १६ पदे पदोन्नतीकरिता मंजूर आहेत. शासन अधिसूचना दिनांक ०९/०९/२०१४ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मध्ये विहीत केल्यानुसार नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या म्हणजेच मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा समकक्ष अर्हता तसेच वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपिक, अधिक्षक किंवा समकक्ष संवर्गातील कर्मचा-यांमधून किमान ५ वर्षाचा अनुभव अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन पत्र क्रमांक वविम-१९२१/प्र.क्र.२१/नवि-२३ दि.२६/११/२०२१ नुसार पदोन्नतीकरिता ५ वर्षे सेवेची अट शिथील करून ३ वर्षे करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६ व दिनांक ०७/०५/२०२१ नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने जे मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी शा.नि. सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब. दिनांक २५/०५/२०२४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/कर्मचारी (अ) दिनांक २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व (ब) दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील. उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील निर्णयाच्या अधिन असतील. अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदावनत करण्यात येऊ नये.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ दिनांक २९/०५/२०१९ मधील मुद्दा क्र. १२ नुसार केंद्र शासनाने दि. १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशात दिव्यांगांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ठेवलेली आहे. परंतु २०१६ मध्ये संबंधित राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्यशासन नेहमीच केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करत आले आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०१९/प्र.क्र.३७/९१/१६ - अ दि.०५/०३/२००२ अन्वये दिव्यांग कर्मचा-यांना गट-क व गट-ड मधील पदावर पदोन्नतीमध्ये 3% आरक्षण विहित करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/२६ अ दि.२९/०५/२०१९ अन्वये दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार शासन सेवेतील दिव्यांग व्यक्तीसाठी ४% आरक्षण विहित करण्यात आलेले असून आरक्षण अमंलबजावणीची कार्यपद्धती विशद करण्यात आलेली आहे. त्यानुसार एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतील सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक आयुक्त खालील प्रमाणे पदोन्नतीने भरावयाची असल्याने त्याचा गोषवारा खालील प्रमाणे

अ.क्र.	पदाचे विवरण	एकूण मंजूर पदे	सरळसेवा			पदोन्नती				एकूण पदोन्नतीची रिक्त पदे
			मंजूर	भरलेले	रिक्त	मंजूर	भरलेले	रिक्त	संभाव्य रिक्तपदे	
१	सहाय्यक आयुक्त	३१	७	०	७	१६	८	८	०	८

टिप :- * सेवा प्रवेश नियमावलीनुसार नामनिर्देशन करीता २५%, प्रतिनियुक्ती करीता २५% व पदोन्नती करीता ५०% अशी विभागणी केलेली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१/१६.ब. दि.२६/१०/२००४ अन्वये आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भातील विहीत कार्यपध्दतीनुसार व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बी सी सी-२००१/१८८७/प्र. क्र. ६४/०१/१६-ब. दि. २५/०५/२००४ मधील मुद्दा क्र.३ अ मध्ये नमूद केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार सहाय्यक आयुक्त (पदोन्नती) संवर्गातील निर्बांध रिक्त व संभाव्य रिक्त पदांची स्थिती तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब. दि. १८/१०/१९९७ सोबतचे पदोन्नतीची १०० बिंदू नमुनेवजा नामावली नुसार प्रत्येक राखीव प्रवर्गाकरिता ठरवून देण्यात आलेली आहे. तथापि, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ मधील तरतुदीनुसार आरक्षित प्रवर्गातील पदे खुल्या प्रवर्गातून भरण्याचे निर्देश आहेत.

कार्यालयाचे परिपत्रक क्र.वविशम/आस्था/११(अ)/सु.ज्ये.सु/२०२६/परि. १६. दिनांक १३/०१/२०२६ अन्वये अंतिम ज्येष्ठता यादी प्रकाशित करण्यात आली आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६ ब. दि.०७/०५/२०२१ मधील तरतुदीनुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार शासन मान्यतेच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२. दिनांक ०१/०८/२०१९ मधील मुद्दा क्र. ६.१ नुसार १ ते ३ पदे उपलब्ध असल्यास तिप्पट परंतु कमान ७ कर्मचारी विचारात घ्यावे, ४ ते ९ पदे उपलब्ध असल्यास दुप्पट परंतु कमाल १४ कर्मचारी विचारात घ्यावे आणि १० किंवा त्यापेक्षा अधिक पदे उपलब्ध असल्यास दिडपट कर्मचारी विचारात घ्यावे अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील "अधिक्षक संवर्गातील कर्मचा-यांना "सहाय्यक आयुक्त" या पदावर पदोन्नती देणेकामीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता तो विभागीय पदोन्नती समितीपुढे निर्णयाकरिता ठेवणेस मान्यता देण्यात आली.

सदर मान्यतेच्या अनुषंगाने दि.२०/०७/२०२६ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत याबाबत चर्चा झाली व झालेल्या चर्चेनुसार बैठकीचे इतिवृत्त सादर करण्यात आले आहे.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६ ब. दिनांक ०७/०५/२०२१ मधील तरतुदीनुसार सर्व प्रवर्गातील पदोन्नतीचे पदे भरण्याचे निर्देश असल्याने निर्बांध रिक्त पदे ०८ व संभाव्य रिक्त पदे ०० अशी एकूण ०८ रिक्त पदे (खुला प्रवर्ग) पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात यावीत असा निर्णय पदोन्नती समितीने एकमताने घेतला व कार्यालयाचे परिपत्रक क्र. वविशम/आस्था/११ (अ)/सु.ज्ये. सु/२०२६/परि.१६. दिनांक १३/०१/२०२६ अन्वये अधिक्षक संवर्गाची अंतिम ज्येष्ठता यादी प्रकाशित करण्यात आली आहे. ज्येष्ठता सूचीतील खालील पात्र

कर्मचाऱ्यांचा त्यांच्या ज्येष्ठतेनुसार सर्व प्रवर्गातील सहाय्यक आयुक्त (पदोन्नती) संवर्गाची निर्बांध रिक्त पदे व संभाव्य रिक्त पदे यांचा पदोन्नती देण्यासाठी खालील कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात आलेला आहे.

सहाय्यक आयुक्त या संवर्गात निर्बांध रिक्त पदे ०८ + संभाव्य ०० = ०८

वेतन स्तर = एस १६ (रुपये ४४९००-१४२४००)

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	प्रवर्ग	दि.०१/०१/२०२५ रोजीचा अंतिम ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्र.	शेरा
१	धर्मेंद्र नंदा पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	४	शैक्षणिक अर्हता नाही.
२	सुरेश अनंत भोईर	अधिक्षक	इ.मा.व.	६	शैक्षणिक अर्हता नाही.
३	महेश नामदेव पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	७	शैक्षणिक अर्हता नाही.
४	हरेश्वर काशिनाथ तुंबडा	अधिक्षक	अ.जा.	९	शैक्षणिक अर्हता व इतर कागदपत्रे व गोपनिय अहवाल उपलब्ध नाहीत.
५	योगेश गुरूनाथ पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	१०	शैक्षणिक अर्हता नाही.
६	विजयदा. पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	२४	शैक्षणिक अर्हता नाही.
७	अशोक रामचंद्र पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	३०	शैक्षणिक अर्हता नाही.
८	कुंदन अ. घरत	अधिक्षक	इ.मा.व.	३३	शैक्षणिक अर्हता नाही.
९	प्रेमनाथ घरत	अधिक्षक	इ.मा.व.	४०	शैक्षणिक अर्हता नाही.
१०	जोजेफ पी. डिकोस्टा	अधिक्षक	खुला	४२	शैक्षणिक अर्हता नाही.
११	राजू प. पाटील	अधिक्षक	खुला	४३	शैक्षणिक अर्हता नाही.
१२	जोजेफ मिनेजिस	अधिक्षक	खुला	४४	शैक्षणिक अर्हता नाही.
१३	जितेंद्र नाईक	अधिक्षक	खुला	४८	पात्र
१४	मनाली शिंदे	अधिक्षक	खुला	५०	पात्र
१५	निलेश म्हात्रे	अधिक्षक	इ.मा.व.	५१	पात्र. परंतु चौकशीचे ज्ञापन व दोषारोप बजावण्यात आल्याने बंद लिफाफ्यात ठेवण्यात आला आहे.
१६	सुरेश हरेश्वर पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	५२	पात्र

सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभाग परि.क्र.CBC/११०१०४/प्र.क्र.५७०, दि.०५/०३/२००५ अन्वये मागास प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासणे बंधनकारक केले आहे. उपरोक्त सर्व कर्मचा-यांनी त्यांची जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामुळे दि.०१/०१/२०२५ रोजी या दिनांकास आधारित प्रकाशित करण्यात आलेल्या अंतिम ज्येष्ठता सूचीतील कर्मचारी विचारात घेतल्यानंतर त्यांच्या सन २०२०-२१ ते सन २०२४-२०२५ या सलग ५ वर्षातील गोपनीय अहवालाचे अवलोकन करुन ज्याच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी 'ब' पेक्षा कमी नाही व जे पदोन्नती देण्याकरीता आवश्यक असलेल्या सर्व अटीची पूर्तता व अर्हता प्राप्त करीत आहेत. अशा कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून रिक्त पदावर पदोन्नती देण्याकरीता खालील विवरण पत्र क्रमांक १ तयार करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीला खुल्या प्रवर्गामध्ये ८ रिक्त पदे आहेत. परंतू पदोन्नती करिता केवळ ४ कर्मचारी पात्र आहेत. त्यातील अनुक्रमांक ३ वरील श्री. निलेश म्हात्रे यांना ज्ञापन देण्यात आले असून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीचा निकाल लागल्यास व त्यामध्ये ते निर्दोष मुक्त झाल्यास नव्याने DPC न घेता त्यांना निर्दोष मुक्ततेच्या दिनांकापासून पदोन्नती देणे क्रमप्राप्त राहील. एकंदरीत खालील विवरण पत्र क्र.१ मधील क्रमांक १ वरील श्री. जितेंद्र नाईक क्रमांक २ वरील श्रीमती मनाली शिंदे, क्रमांक ४ वरील श्री. सुरेश पाटील यांना पदोन्नतीच्या रिक्त ३ पदांवर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत तथा क्रमांक ३ वरील श्री. निलेश म्हात्रे यांची निर्दोष मुक्तता झाल्यास त्यांना निर्दोष मुक्ततेच्या दिनांकापासून पदोन्नती देण्याबाबतचा निर्णय पदोन्नती समितीने एकमताने घेतला आहे.

अ) जेष्ठतेनुसार निवड केलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित निवडसूची क्र.१ पुढीलप्रमाणे आहे.

विवरणपत्र १ (निवडसूची)

अ. क्र.	कर्मचाऱ्याचेनाव	पदनाम	प्रवर्ग	दि.०१/०१/२०२५ रोजीचा अंतिम ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठताक्र.	शेरा
१	जितेंद्र नाईक	अधिक्षक	खुला	४८	पात्र-निवड १
२	मनाली शिंदे	अधिक्षक	खुला	५०	पात्र- निवड २
३	निलेश म्हात्रे	अधिक्षक	इ.मा.व.	५१	पात्र. परंतु चौकशीचे ज्ञापन व दोषारोप बजावण्यात आल्याने बंद लिफाफ्यात ठेवण्यात आला आहे.
४	सुरेश हरेश्वर पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	५२	पात्र-निवड ३

ब) निवडसूची .

क्र.१ मधील अ.क्र.३ वरील श्री. निलेश म्हात्रे यांचे प्रकरण बंद लिफाफ्यात ठेवणे आवश्यक

आहे व त्याचे विवरणपत्र २ पुढीलप्रमाणे आहे.

विवरणपत्र २ (बंद लिफाफा)

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	प्रवर्ग	दि.०१/०१/२०२५ रोजीचा अंतिम ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्र.	शेरा
१	निलेश म्हात्रे	अधिक्षक	इ.मा.व.	५१	पात्र. परंतु चौकशीचे ज्ञापन व दोषारोप बजावण्यात आल्याने बंद लिफाफ्यात ठेवण्यात आला आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५ अन्वये शासन मान्यतेच्या व कलम ५३ अन्वये महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून उपरोक्त सर्व कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस पदोन्नती समितीने मान्यता दिलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या "अधिक्षक" संवर्गातून "सहाय्यक आयुक्त" या पदावर पदोन्नती देण्याच्या प्रस्तावावर सभेमध्ये विचार विनिमय करण्यात आला.

ठराव/निर्णय :- मा.विभागीय पदोन्नती समितीच्या दि.२०/०७/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मा.विभागीय पदोन्नती समितीने अधिक्षक सवंर्गातून वर्ग – २ च्या सहाय्यक आयुक्त या पदावर पदोन्नती देणेसाठी खालील कर्मचा-यांची शिफारस केलेली आहे.

अ) जेष्ठतेनुसार निवड केलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित निवडसूची क्र.१ पुढीलप्रमाणे आहे.

विवरणपत्र १ (निवडसूची)

अ.क्र.	कर्मचाऱ्याचेनाव	पदनाम	प्रवर्ग	दि.०१/०१/२०२५ रोजीचा अंतिम ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्र.	शेरा
१	जितेंद्र नाईक	अधिक्षक	खुला	४८	पात्र-निवड १
२	मनाली शिंदे	अधिक्षक	खुला	५०	पात्र- निवड २
३	निलेश म्हात्रे	अधिक्षक	इ.मा.व.	५१	पात्र. परंतु चौकशीचे ज्ञापन व दोषारोप बजावण्यात आल्याने बंद लिफाफ्यात ठेवण्यात आला आहे.
४	सुरेश हरेश्वर पाटील	अधिक्षक	इ.मा.व.	५२	पात्र-निवड ३

विवरणपत्रातील क्रमांक १ वरील श्री.जितेंद्र नाईक क्रमांक २ वरील श्रीमती मनाली शिंदे क्रमांक ४ वरील श्री.सुरेश हरेश्वर पाटील यांना पदोन्नतीच्या रिक्त ३ पदांवर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस तथा क्रमांक ३ वरील श्री.निलेश म्हात्रे यांची निर्दोष मुक्तता झाल्यास उपरोक्त अधिका-यांच्या पदोन्नतीच्या आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच वरील अधिका-यांचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५ (४) नुसार शासनाच्या मान्यतेकरिता शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- महानगरलिकेत ठोक वेतनावरील कार्यरत कर्मचारी श्री. गजानन ओगे व इतर २७ कर्मचारी यांना मा. उच्च न्यायालयातील आदेशानुसार अदा करणेत आलेल्या वेतन फरकास कार्येत्तर मान्यता मिळणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दिनांक **०३** जुलै, **२००९** रोजी झाली. त्यात वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपुर या चार नगरपरिषदासह **५५** महसुली गावांचा समावेश आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम **४९३** चे परिशिष्ट -४ मधिल अनुक्रमांक **५** (क) मध्ये महानगरपालिकेच्या स्थापनेच्या नियत दिवसाच्या निकटपूर्वी उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नोकरीत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, या अधिनियमान्वये महानगरपालिकेने नेमलेले अधिकारी/कर्मचारी असतील आणि या अधिनियमाच्या तरतुदीनंतर अन्य तरतुद करण्यात येईपर्यंत अशा तारखेस त्यास जे वेतन भत्ते मिळण्याचा हक्क होता आणि ते ज्या सेवेच्या ज्या शर्तीच्या अधिन होते, तेच वेतन व भत्ते त्यास मिळतील आणि ते त्याच सेवेच्या शर्तीच्या अधिन असतील. परंतु अशा अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी नियत दिवसापुर्वी केलेली सेवा ही, महानगरपालिकेच्या सेवेत असतांना केलेली सेवा आहे असे मानले जाईल अशी तरतुद आहे. त्यानुसार तत्कालीन नगरपरिषदा व ग्रामपंचायती मधिल कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते देण्यात येत आहेत.

त्यातील कांही भुतपुर्व ग्रामपंचायत कार्यालयातील **३२** कर्मचारी हयांना ग्रामपंचायतीमध्ये कायम करणेत आले होते. परंतु त्यांना वेतनश्रेणी लागू करणेत आलेली नव्हती. अशा कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीमध्ये असताना जे ठोक वेतन अदा केले जात होते. तेच वेतन त्यांना महापालिका स्थापन झालेपासून अदा करणेत आले.

सदर कर्मचारी ठोक वेतनावर असल्याने त्यांना रु. **१०००/-** रु. **१५००/-** रु. **२०००/-** असे ठोक वेतन होते. त्याची आर्थिक पिळवणुक होवु नये. मा महासभा ठराव क्र. **११** दि. **१५/०९/२०१२** अन्वये सदर कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे वेतन अदा केले जात आहे.

तथापी सदर कर्मचाऱ्यांपैकी **२८** कर्मचाऱ्यांनी समान वेतन अदा करण्याबाबत मा. उच्च न्यायालयात रिट पिटिशन क्र. **९४४२/२०१९** दाखल केले. सदर पिटीशनवर मा. उच्च न्यायालयाने दि. **०५/०५/२०२६** रोजीच्या आदेशान्वने खालील प्रमाणे अंतिम निर्णय दिले.

Municipal Corporation is directed to deposit in this Court total amount due and payable to the petitioners as per the order dated ९ March २०२६ passed by this Court in the aforesaid Writ Petition and/or make payment of the said amount to the concerned employees, within a period of ten days from today.

Till such deposit and/or payments are made, the Municipal Corporation is directed to stop the expenditure on all activities except expenses relating to the essential services like electricity dues, telephone bills. It is specifically directed that all works of road, buildings and payment of the contractors and, for that purpose, even the salaries of the superior officers of the Corporation including their TA/DAs and other office expenses of the Councillors shall not be released till further orders from the Court.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सदर **२८** कर्मचाऱ्यांना नियमित केल्यानुसार अदा करावयाच्या वेतन फरकाची परिगणना करणेस विलंब लागणार असल्याने सदर कर्मचाऱ्यांपैकी लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांस अंदाजे रु.**२९,१६,०६४/-** असे प्रत्येकी (रु.**२९,१६,०६४** X ४ कर्मचारी = **१,१६,६४,२५६/-** रुपये) व चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांस अंदाजे रु. **२१,३३,७८३/-** असे प्रत्येकी (रु. **२१,३३,७८३** X २४ कर्मचारी = **५,१२,१०,७९२/-** रुपये) असे एकुण अंदाजे रु. **६,२८,७५,०४८/-** (अक्षरी सहा कोटी अठाविस लाख पंच्याहत्तर हजार अठेचाळीस रुपये मात्र) या रकमेचा बँक ऑफ महाराष्ट्र धनाकर्ष क्र. **७९१२८** दि.**१३/०५/२०२६** अन्वये मा. उच्च न्यायालयात भरणा करणेत आला.

तदनंतर सदर कर्मचाऱ्यांची सन **२००९** पासून ते आजतागायत अदा वेतनाच्या तपशीलानुसार वेतन फरकाची परिगणना करणेत आली व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतन फरकाची व ८% प्रतिवर्ष व्याजाची परिगणना केली असता फरकाकरीता रक्कम रु.**५,९५,०९,८१४**/- तसेच व्याजाकरीता रक्कम रु.**२,९२,२४,५४०**/- असे एकूण रक्कम रु.**८,८७,३४,३५४**/- देय ठरत आहेत. या मधून आयकर वजावट (**TDS**) १०% प्रमाणे रु. **८८,७३,४३७**/- रक्कम वजा केली असता संबधितास अंतिम देय रक्कम रु. **७,९८,६०,९१७**/- देय ठरते. सदर रकमेमधून मा. उच्च न्यायालयाकडे यापूर्वी रक्कम रु. **६,२८,७५,०४८**/- धनाकर्षाद्वारे भरणा केलेला असल्याने उर्वरित रक्कम रु. **१,६९,८५,८६९**/- बँक ऑफ महाराष्ट्र धनाकर्ष क्र.**७९१२३५** दि. ११/**०६/२०२६** रोजी मा. उच्च न्यायालयात भरणा करणेत आलेली आहे.
तथापी, श्री. गजानन ओगे व इतर **२७** कर्मचारी यांना अदा करणेत आलेल्या वेतनफरक व व्याज रक्कम रु. **८,८७,३४,३५४**/- (रक्कम रु. **आठ कोटी सत्याऐंशी लाख चौतीस हजार तिनशे चौपन्न** मात्र.) **रक्कमेस कार्योत्तर मान्यतेकरीता मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.**

ठराव / निर्णय :- मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार श्री. गजानन ओगे व इतर २७ कर्मचारी यांना नियमित कर्मचारी वेतनश्रेणीनुसार सन २००९ ते मार्च २०२६ पर्यंत अदा करणेत आलेल्या वेतन फरकाची रक्कम व ८% प्रतिवर्ष व्याजाची रक्कम अशी एकूण रक्कम रु. ८,८७,३४,३५४/- (रक्कम रु. आठ कोटी सत्याऐंशी लाख चौतीस हजार तिनशे चौपन्न मात्र.) या रक्कमेस आजची हि सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत ६ महिने कंत्राटी पद्धतीने कार्यरत वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांची मुदत दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त होत असल्याने विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत सध्यस्थितीत महानगरपालिका कार्यक्षेत्रात २ माताबाल संगोपन केंद्र, ७ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, १५ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व ४५ आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यरत आहेत. सन २०१३ पासून वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आले.

सन २०१९ मध्ये जगभरात कोव्हिड - १९ हया आजाराने नागरीक त्रस्त होते, माहे मार्च – २०२० मध्ये भारतात कोव्हीड - १९ चे प्रादुर्भाव सुरू झाले व तद्नंतर जास्त प्रमाणात आजार पसरू लागले. सदर आजाराचे प्रादुर्भाव महाराष्ट्र राज्यात उद्रेक सुरू झाल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणी करीता अत्यावश्यक सेवा म्हणून मा. सर्वसाधारण सभा, ठराव क्र. १९, दि. १६/०३/२०२० अन्वये महानगरपालिकेने वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत विविध ठिकाणी नव्याने कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, कोव्हीड हेल्थ सेंटर, व कोव्हीड-१९ रुग्णालये स्थापन केले. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये वैद्यकीय अधिकारी, जी.एन.एम. ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, इत्यादी पॅरामेडीकल स्टाफची आवश्यकता लक्षात घेता महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटीपध्दतीने ठोक मानधनावर उपरोक्त पदांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत कोव्हिड - १९ आजाराचे प्रादुर्भाव कमी प्रमाणात असल्याने महानगरपालिकेने जे रुग्णालय कोव्हीड - १९ साठी सुरू केलेले होते त्यांचे सामान्य रुग्णालयात रुपांतरीत केलेले आहेत. तथापि, वसई विरार शहर महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या बघता कोव्हिड - १९ मध्ये कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी तसेच महानगरपालिकेने वेळोवेळी ठोक मानधनावर नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुनर्नियुक्ती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार वरील संदर्भिय **मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.०८ दि.३०/०३/२०२६** पुनर्नियुक्ती दिलेनुसार सद्यस्थितीत ६ महिने कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले स्त्रीरोग तज्ञ- **०५,** बालरोग तज्ञ- **०८,** भिषक- **०२,** अस्थीरोग तज्ञ- **०२,** शल्यचिकित्सक- **०४,** नेफ्रोलॉजीस्ट- **०१,** त्वचा व गुप्तरोग तज्ञ- **०२,** कान-नाक-घसा तज्ञ- **०२,** नेत्रशल्यचिकित्सक- **०१,** **पॅथॉलॉजीस्ट-०२,** एम.बी.बी.एस.- ०२, बी.ए.एम.एस.- ४५, जी.एन.एम.- १२५, पी.एच.एन.- ०२, ए.एन.एम.- १६८, फार्मासिस्ट- ३०, प्रयोगशाळा सहाय्यक- ३८, क्ष-किरण सहाय्यक-७, डायलिसिस पर्यवेक्षक- ०१ डायलिसिस तंत्रज्ञ- ०८, समुपदेष्टा- ०३, समाजसेवक- ०२, शितसाखळी तंत्रज्ञ- ०१ अश्या एकुण ४६१ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचा ६ महिन्यांचा कंत्राटी सेवा कालावधी दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त होत आहे.

तसेच कोव्हीड-१९ अंतर्गत नियुक्त केलेल्या ६ महिने कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले मायक्रोबायोलॉजीस्ट- ०१, भिषक- ०२, नेत्रशल्यचिकित्सक- ०१, बी.ए.एम.एस.- २९, जी.एन.एम.- ८९, ए.एन.एम.- ८३, फार्मासिस्ट- १४ , प्रयोगशाळा सहाय्यक- १४ क्ष-किरण सहाय्यक- ०८ अश्या एकूण २४१ वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचा ६ महिन्यांचा कंत्राटी सेवा कालावधी दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त होत आहे.

तसेच मा. प्रशासकीय ठराव क्र.१९३३ दि.१२/१२/२०२५ अन्वये मान्यतेनुसार कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या थेट मुलाखती पदभरती प्रक्रियेतील निवड समितीने निवड केलेले स्त्रीरोग संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांना आदेश क्र. वविशम/वैआवि/५७८/२०२६ दि.०८/०६/२०२६ अन्वये डॉ. स्नेहा सेनचौधरी यांची ३ महिने कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी-स्त्रीरोग तज्ञ या पदावर नियुक्ती आदेशानुसार दि.१८/०६/२०२६ रोजी हजर झाले आहेत. सदरहू वैद्यकीय अधिकारी यांचा ३ महिने कंत्राटी सेवा कालावधी दि.१७/०९/२०२६ रोजी समाप्त होत असल्याने वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा असल्याने प्रशासकीय कामाच्या सोईच्या दृष्टीने त्यांचा कंत्राटी सेवा कालावधी एकाच दिवशी दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त करणे आवश्यक आहे.

सबब वरील सर्व ६ महिने कालावधीकरीता कंत्राटी पदांवरील कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांना पुढील सेवेबाबत १ दिवसाचा तांत्रिक खंड दयावयाचा असल्यास दि.०१/०९/२०२६ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देणे योग्य होईल. सदर वैद्यकीय अधिकारी / पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना दि.०२/०९/२०२६ ते दि.२८/०२/२०२७ या ६ महिन्याच्या कंत्राटी सेवा कालावधीसाठी नवीकरण केल्यास त्यांच्या मानधनापोटी दरमहा रु.२,२८,०९,१६२/- व सहामाही रु.१३,६८,५४,९७२/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. (सोबत प्रपत्र क्र.१) तसेच उपरोक्तपैकी महानगरपालिका ६ महिने कंत्राटी सेवा अंतर्गत कार्यरत

असलेले ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक व शितसाखळी तंत्रज्ञ असे एकूण २४४ पॅरामेडिकल कर्मचारी यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी लागू असल्या कारणाने त्यांचे अंशदान (रु.१५,०००/- मानधन या कमाल मर्यादेवर १२% प्रमाणे रु.१८००/- प्रति महिना प्रति कर्मचारी मानधनातुन नियमित कपात करण्यात येत आहे.) तसेच त्यांना १३% महानगरपालिका भविष्य निर्वाह निधी अंशदान प्रति कर्मचारी रु.१,९५०/- महानगरपालिका अंशदानापोटी होणाऱ्या अंदाजे मासिक रु.४,७५,८००/- व सहामाही रु.२८,५४,८००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरील अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

यानुसार सदर मानधनापोटी होणारा खर्च सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात "रुग्णालय वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.४०,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमधून मानधनापोटी सहामाही रु.१३,६८,५४,९७२/- व ईपीएफ महानगरपालिका अंशदानापोटी होणाऱ्या सहामाही रु.२८,५४,८००/- असे एकूण रु.१३,९७,०९,७७२/- खर्च अपेक्षित आहे. सदरहू कार्यरत विविध कंत्राटी संवर्गातील पदांचे ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नवीकरण करणेस मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.
सबब मा. भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (SIR) कार्यक्रमांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत माहे जूलै २०२६ पासुन अतिमहत्वाचे मा. भारत निवडणूक आयोगाकडुन मतदार यादीचे कालबंध मर्यादेत सखोल पुनरिक्षणाच्या (SIR) प्रक्रिया कामकाज चालू असल्याने थेट मुलाखती भरतीप्रक्रिया राबविणे विभागास शक्य नाही. तथापी, उपरोक्त संवर्गातील कंत्राटी पदे बाहययंत्रणेव्दारे (अभिकर्त्यांमार्फत) विविध संवर्गातील सेवा प्राप्त करुन घेणेकामी निविदा प्रक्रिया करुन भरण्यात यावी किंवा पुढील ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नवीकरण करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवणेस शिफारस आहे.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ६ महिने कंत्राटी तत्वावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांची मुदत दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त झाल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, उपरोक्त प्रस्ताव नमूद वैद्यकीय अधिकारी / पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना यांना दि.०१/०९/२०२६ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देणे व सदर कार्यरत तांत्रिक पदांचे पुढील ६ महिन्यांसाठी दि.०२/०९/२०२६ ते दि.२८/०२/२०२७ कालावधीपर्यंत नवीकरण करणेस व याकामी त्यांचे मानधनापोटी सहामाही रु.१३,६८,५४,९७२/- व ईपीएफ महानगरपालिका अंशदानापोटी होणाऱ्या सहामाही रु.२८,५४,८००/- असे एकूण रु.१३,९७,०९,७७२/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकारी /कर्मचारी यांच्या नव्याने तयार करणेत आलेल्या आकृतीबंधाला मंजुरी मिळणेबाबत. (दि.१७/०७/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)

ठराव / निर्णय :- सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची उभारणी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्र हे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे शहर असून, शहरातील विविध प्रमुख चौक, प्रवेशद्वार, सार्वजनिक स्थळे व विकसित करण्यात येणाऱ्या ठिकाणी महापुरुषांच्या स्मृती जतन करण्याच्या दृष्टीने सौंदर्यीकरणाची कामे करण्यात येत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना करून शौर्य, प्रशासन, सामाजिक न्याय व जनकल्याणाचा आदर्श निर्माण केला. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीत मोलाचे योगदान देऊन सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाची मूल्ये देशाला दिली.

तसेच मा.श्री.अजीव पद्मावती यशवंत पाटील, महापौर, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची उभारणी करणेकामी दि.३०/०७/२०२६ रोजीच्या लेखी पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

सदर महापुरुषांचे विचार व कार्य नागरिकांपर्यंत पोहोचावे तसेच शहराच्या ऐतिहासिक व सामाजिक वारशाचे जतन व्हावे, या उद्देशाने महानगरपालिका क्षेत्रातील योग्य व प्रमुख ठिकाणी त्यांचे आकर्षक व दर्जेदार पुतळे उभारणे उचित राहील.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रकारच्या ठिकाणांची पाहणी करून योग्य जागांची निवड करणे गरजेचे आहे.

१. महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख प्रवेशद्वार व शहराच्या हद्दीवरील प्रमुख ठिकाणे.
२. प्रमुख वाहतूक चौक व जंक्शन.
३. विकसित/प्रस्तावित सार्वजनिक चौक व उद्याने.
४. नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात वर्दळीची सार्वजनिक ठिकाणे.
५. ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे.
६. महानगरपालिकेच्या मालकीच्या उपलब्ध जागा.
७. इतर शासकीय/स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या जागा, आवश्यक परवानगी प्राप्त करून. प्रत्येक निवडलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार व जागेच्या उपलब्धेनुसार खालील कामे करून घेणे आवश्यक आहेत.

* छत्रपती शिवाजी महाराज यांचा मानांकित आकारमानातील पुतळा.
* भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानांकित आकारमानातील पुतळा.
* आर.सी.सी. पेडेस्टल/चबुतरा.
* पुतळ्याच्या सभोवतालचे लँडस्केपिंग व सुशोभीकरण.
* आकर्षक फरशी/पेव्हर ब्लॉक इत्यादी.
* सजावटीचे विद्युत दिवे व आवश्यक प्रकाशव्यवस्था.
* आवश्यक संरक्षक रेलिंग.
* माहितीफलक/नामफलक.
* आवश्यकतेनुसार वृक्षारोपण व हरितपट्टा.
* पावसाच्या पाण्याचा निचरा व इतर नागरी सुविधा.
* आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही. व सुरक्षा व्यवस्था.
* संबंधित विभागांकडून आवश्यक परवानग्या/ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करणे.

तसेच प्रत्येक ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करून वाहतूक सुरक्षितता, उपलब्ध जागा, मालकी हक्क, पादचारी व वाहनांची वर्दळ, भविष्यातील विकास आराखडा, विद्युत/जलवाहिन्या व इतर सार्वजनिक सुविधा यांचा विचार करून जागा निश्चित करणे उचित राहील. व पुतळे उभारण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी, आवश्यक शासकीय/स्थानिक प्राधिकरणांची ना-हरकत प्रमाणपत्रे व लागू असलेल्या शासन निर्णय/नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पुतळा - ३२९१/प्र.क्र.३०८/२९, दि. २ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुतळे उभारण्यासंदर्भात परवानगी देण्याच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक पुतळा समिती स्थायी स्वरूपात गठीत केलेली आहे.

तरी सदर पुतळा उभारण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आले आहेत.

१) कोणत्याही व्यक्ती / संघटना / संस्था, शासकीय / निमशासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभा करू शकणार नाही.

२) पुतळे उभारण्याच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद नसावा, ती जागा अनधिकृत किंवा अतिक्रमित केलेली नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधित पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती / संस्था / कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणाऱ्या व्यक्ती/संस्था/कार्यालयास हक्क राहणार नाही.

३) पुतळा बसविणाऱ्या समितीने व्यक्ती / संस्था / कार्यालय / समितीने पुतळ्याच्या चबुतऱ्यांचे मोजमाप, आराखडा, पुतळ्याचा साईट प्लॅन, पुतळा ज्या धातू / साहित्यातून तयार करण्यात येणार आहे, त्या धातू / साहित्याचे प्रमाण, पुतळ्याचे वजन, उंची व रंग याचा तपशील पुतळ्याच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना किंवा त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करून मान्यता घेतलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

४) पुतळा उभारणाऱ्या संस्थेने पुतळ्याच्या कलेचे मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेऊन ब्राँझ वा अन्य धातू, फायबर वा इतर साहित्यापासून पुतळा तयार करावा आणि मान्यता घेतलेल्या मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी.

५) पुतळा उभारण्यामुळे गाव / शहर सौंदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधित संस्था / कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घेण्यात यावी.

६) पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करून संबंधित पोलीस कार्यालय प्रमुखाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्याबाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

७) शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परिसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असावे.

८) स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करून प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही अशा प्रकरणी संबंधित व्यक्ती / संस्था / कार्यालय यांनी पारित केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

९) पुतळा उभारण्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्याबाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन प्रस्तावासोबत जोडावे.

१०) भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकास कामामध्ये पुतळा हलविण्याचा प्रसंग उद्भवल्यास त्यास विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्वखर्चाने करण्याबाबत पुतळा उभारणाऱ्या संस्थेने शपथपत्र घेण्यात यावे.

११) पुतळ्याची देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी स्वीकारत असल्याचे कारणपर पुतळा उभारणाऱ्या संस्थेकडून घेण्यात यावे.

१२) पुतळा उभारण्याबाबत संबंधित पुतळा उभारणी संस्था सर्व दृष्टिकोनातून सक्षम आहे काय याची छाननी जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

१३) पुतळ्यासंबंधीचा खर्च पुतळा उभारणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेचे वचनपत्र प्रस्तावासोबत घेण्यात यावे.

१४) पूर्व परवानगी शिवाय पुतळा उभारल्यास संबंधित व्यक्ती / संस्था / समितीवर दंडात्मक कारवाई बरोबर कायदेशीर कारवाई करावी तसेच पुतळा हटविण्याची कारवाई करण्यात यावी.

१५) पुतळ्याला मान्यता देताना जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने महसूल व वन विभाग, गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन आदेश / परिपत्रक यातील सूचना लक्षात घ्याव्यात व त्यासंदर्भात आपले अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करावेत. जागेची मालकी ज्या संस्थेची / कार्यालयाची आहे त्या संस्थेची / कार्यालयाची सहमती प्राप्त करून घ्यावी.

१६) पुतळा उभारण्यास अनुमती द्यावी किंवा कसे याबाबत स्पष्ट शिफारस कारण मिमांसेसह जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावास मान्यता द्यावी.

१७) मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये **IA No. १० of २०१२ in S.L.P. (C) No. ८५१६ of २००६** व **W.P. (C) No. ३१४/२०१०** बाबत दिनांक २८/०९/२०२३ देण्यात आलेल्या आदेशाचे पालन करून त्यांचे उल्लंघन होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी तसेच त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावे.

१८) पुतळा उभारण्यास मान्यता द्यावयाच्या आदेशामध्ये पुतळ्याचे निश्चित ठिकाण, जागेची मालकी, सर्वे नंबर, नियोजित ठिकाणास सर्व बाजूच्या रस्त्याच्या मध्यभागापासूनचे अंतर, पुतळ्याची देखभाल व दुरुस्ती, मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपूर्ण तपशील समाविष्ट करण्यात यावा.

१९) पुतळा उभारण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन / पूर्तता केल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खात्री करावी.

२०) पुतळा उभारण्यासाठी पारित केलेले ठराव, ना-हरकत प्रमाणपत्रे ६ वर्षापेक्षा अधिक जुनी असू नयेत अशी तरतूद समाविष्ट करण्यात यावी. ना-हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रुटींची पूर्तता करून ६ महिन्यांच्या आत ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे किंवा नाकारावे.

२१) राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देताना त्याच राष्ट्रपुरुष / थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात किंवा शहरामध्ये २ कि.मी. जियेच्या परिसरात पूर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

प्रत्येक ठिकाणाची जागा निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्ष मोजमाप व आवश्यक कामांचे स्वरूप विचारात घेऊन स्वतंत्र/संयुक्त अंदाजपत्रक तयार करण्यात येईल. पुतळा, पेडेस्टल, सुशोभीकरण, विद्युत व्यवस्था, लँडस्केपिंग व इतर अनुषंगिक कामांचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात येईल.

सदर कामासाठी प्रथम महानगरपालिका क्षेत्रातील योग्य जागांची पाहणी करून संबंधित जागांची मालकी व उपलब्धता तपासणे, आवश्यक परवानग्या/ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करणे व त्यानंतर तांत्रिकदृष्ट्या योग्य आराखडा व अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता व उपलब्ध तरतुदीनुसार आर्थिक मान्यता प्राप्त करून नियमानुसार निविदा प्रक्रिया/कामाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची उभारणी व परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील योग्य जागांची पाहणी करून निवड करण्यास संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या व ना - हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करण्यास, पुतळे व परिसर सुशोभीकरणाचे आराखडे तयार करण्यास त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यास व सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त करण्यास व पुढील निविदा/कामाची कार्यवाही करण्यास सदरचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस शिफारस असे.

ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची उभारणी व परिसराचे सुशोभीकरण करणे कामी मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकाकी निराधार महिलांना वाढीव अनुदानाद्वारे आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकूर :- आपल्या महानगरपालिका क्षेत्रातील एकाकी निराधार महिला या स्वतंत्रपणे व एकाकी जीवन जगत असतात. त्यांना कोणताही भक्कम कौटुंबिक आधार नसल्यामुळे, त्यांना सन्मानाने उदरनिर्वाह करता यावा यासाठी महानगरपालिकेमार्फत सध्या प्रति माहे रु. ३,०००/- इतके आर्थिक साहाय्य (अनुदान) दिले जाते. असे असतानाही, सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळात स्वत:चा उदरनिर्वाह करून महानगरपालिकेचा मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर भरणे हे या एकाकी निराधार महिलांना अत्यंत जिकिरीचे व आर्थिकदृष्ट्या अडचणीचे जात आहे.

या बाबीची व त्यांच्या सामाजिक स्थितीची अत्यंत संवेदनशीलतेने दखल घेत, दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात,मा.महापौर महोदय यांनी ज्या एकाकी निराधार महिलांच्या स्वत:च्या नावे मालमत्ता असेल अशा एकाकी निराधार महिलांना मालमत्ता करात व पाणीपट्टी करात १००% सवलत देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा केली होती.

याबाबत महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभाग (मुख्यालय) यांनी मा.महापौर महोदयांच्या घोषणेच्या आधारे सदर एकाकी निराधार महिलांना मालमत्ता कर व पाणीपट्टी करात सूट देण्याबाबत कायदेशीर बाबींची पडताळणी करुन 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ या कायद्यामध्ये एकाकी निराधार महिलांना अशा प्रकारे मालमत्ता कर व पाणीपट्टीत थेट १००% सवलत (करमाफी) देण्याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद उपलब्ध नाही. त्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून थेट करमाफी देणे शक्य नाही असे चर्चेदरम्यान या विभागास कळविण्यांत आले.

मा.महापौर महोदयांच्या घोषणेचा मूळ उद्देश या निराधार महिलांना कराच्या बोजातून दिलासा देणे हा आहे. त्यामुळे कायदेशीर पेचप्रसंग टाळून हा उद्देश साध्य करण्यासाठी खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करणे प्रशासकीय दृष्ट्या अत्यंत योग्य ठरेल:

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात एकाकी जेष्ठ निराधार महिलांना महिला व बाल कल्याण विभागामार्फत प्रति माहे रु.३०००/- चा लाभ देण्यात आलेला आहे. मा. महापौर यांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने ज्या एकाकी निराधार जेष्ठ महिलांच्या नावे मालमत्ता आहे अशा महिलांच्या अनुदान रक्कमे मध्ये मालमत्ता कर भरणेसाठी रक्कम रु.२०० व पाणीपट्टी देयक भरणा करणे साठी रक्कम रु.२४० असे एकूण रु.४४० प्रतिमाह वाढ केल्यास एकाकी निराधार जेष्ठ महिलांना मासिक अनुदान हे प्रति माहे रु. ३,४४०/- इतके होईल. या वाढीव रकमेचा उपयोग सदर महिलांना महानगरपालिकेचा मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर भरण्यासाठी मदत होईल.

या प्रस्तावामुळे एकाकी निराधार महिलांना कर भरण्यासाठी वाढीव अर्थसाहाय्य मिळेल व त्यांची आर्थिक विवंचनेतून सुटका होऊन मा.महापौर महोदयांच्या घोषणेची योग्य व सकारात्मक अंमलबजावणी होऊ शकेल.

ज्या एकाकी महिलांचे स्वत:च्या नावे मालमत्ता असेल तर वरीलप्रमाणे एकाकी जेष्ठ निराधार महिलांना वाढीव अनुदान दयावयाचे असल्यास यासाठी खालील पात्रता,निकष व अटी या योजनेसाठी लागु करणे आवश्यक राहील.

१. सदर महिला ही एकाकी/निराधार वय वर्षे ६० वरील असावी,त्या एकाकी/निराधार महिलांच्या स्वत:चे नावे मालमत्ता असणे आवश्यक आहे व त्याच्या नावे स्वतंत्र नळ जोडणी आवश्यक आहे.

२. सदर मालमत्तेचा वापर फक्त स्वयं-निवासासाठी केलेला असावा. ती मालमत्ता भाड्याने दिलेली नसावी अथवा तिचा व्यावसायिक वापर होत नसावा. सदर एकाकी/निराधार महिलेच्या मालमत्तेचे क्षेत्र १००० चौ.फुट पेक्षा कमी असावे.याकामी संबंधित महिलेने स्वंयघोषणा पत्र सादर करणे आवश्क राहील.

३. ज्या एकाकी निराधार जेष्ठ महिलेच्या नावे मालमत्ता असेल व त्याला महानगरपालिके मार्फत स्वतंत्र नळ कनेक्शन नसेल तर अशा महिलांना केवळ मालमत्ता कर भरण्यासाठी रु.२०० इतके अनुदान देणे योग्य राहील.

सदर योजनेमध्ये वाढीव अनुदान देणेकामी सन २०२६-२७ मधील या वित्तीय वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पात एकाकी ज्येष्ठ महिलांच्या उपजिविकेकरिता योजनांतर्गत वित्तीय सहाय्य या लेखाशिर्ष खाली लेखा संकेतांक ७२१-२७१००४ अंतर्गत रक्कम रु.६,००,००,०००/- (अक्षरी सहा कोटी रुपये मात्र) इतकी तरतूद करण्यात आली आहे.या तरतूदी अंतर्गत सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

तरी, महानगरपालिका हद्दीतील एकाकी ज्येष्ठ निराधार महिलांना अर्थसहाय्य देण्याच्या योजनेअंतर्गत ज्या एकाकी महिलांच्या स्वत:च्या नावे मालमत्ता असेल व स्वतंत्र नळ पाणीपुरवठा कनेक्शन असेल तर त्यांना मालमत्ता कर भरणेसाठी प्रतिमाह रु.२००/- इतके अनुदान व पाणीपट्टी कर भरणा करणेकामी प्रति महा रु.२४०/- इतके अनुदान देणे योग्य होईल.या कामी वार्षिक अंदाजे रु.५० लक्ष इतका खर्च होऊ शकेल तथापि यानुसार सदर अनुदानात वरीलप्रमाणे वाढ करणेकामी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याने सदरचा विषय धोरणात्मक निर्णयासाठी मा.महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव/ निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्या एकाकी ज्येष्ठ निराधार महिलांच्या स्वत:च्या नावे मालमत्ता व स्वतंत्र पाणी पुरवठा कनेक्शन असेल,त्यांना मालमत्ता कर भरण्यासाठी प्रति महा रु.२००/- आणि पाणीपट्टी देयक भरण्यासाठी प्रति महा रु.२४०/- असे एकूण रु.४४०/- प्रति महा वाढीव अनुदान प्रस्तावात नमुद केलेल्या पात्रता,निकष व अटीस बंधनकारक राहुन वाढीव अनुदान देण्यास ही महासभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच ज्या एकाकी निराधार जेष्ठ महिलेच्या नावे मालमत्ता असेल व त्याला महानगरपालिके मार्फत स्वतंत्र नळ कनेक्शन नसेल तर अशा महिलांना मासिक अनुदान रु.३,२००/- देण्यात यावे व ज्या एकाकी निराधार जेष्ठ महिलेच्या नावे मालमत्ता व पाणी पट्टी दोन्ही आहे अशा महिलांना मासिक अनुदान रु.3,४४०/- देण्यात यावे.

याकरिता होणारा खर्च लेखाशिर्ष-एकाकी ज्येष्ठ महिलांच्या उपजिविकेकरिता योजनांतर्गत वित्तीय सहाय्य,लेखा संकेतांक ७२१-२७१००४ अंतर्गत भागविण्यात यावा.प्रस्तावा मध्ये नमूद केल्यानूसार पात्रता,निकष व अटी यानूसार योजना राबविण्यात यावी तसेच सदर योजनेचे ऑनलाईन अर्ज पोर्टलमध्ये पाणीपट्टी ची प्रत,स्वंयघोषणा पत्र घेण्याबाबत आवश्यक ते तांत्रिक बद्दल करण्यात यावे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पूर्व येथील वॉर्ड क्र ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव (पू.) वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगपालिका हद्दीतील वसई पूर्व येथील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव (पु) वामन ढाबा पर्यंतरस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे या कामास प्रशासकीय ठराव क्र. १४२२ दि. १६/१०/२०२५ अन्वये रु.२६,०७,७५,६९७/- आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर कामाची वृत्तपत्रात ई- निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार १) दैनिक लोकमत २) दैनिक आपला महानगर ३) दैनिक परशुराम समाचार ४) दैनिक जागरुक टाईम्स ५) दैनिक नरवीर चिमाजी ६) दैनिक मिड डे या दैनिकात देण्यात आली होती. सदर कामी दहा निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सात निविदा धारक पात्र ठरले. त्यापैकी मे.एन.ए. कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय किंमतीच्या २०.७९% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समिती ठराव क्र. ०७ दि.२५/०३/२०२६ अन्वये संविदा मंजुरी करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे.

ठेकेदारासोबत करारनामा करुन दि. १४/०४/२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सद्यस्थित ठेकेदाराने खडीकरण व **M.P.M**चे काम तसेच पाईप गटाराचे काम पूर्ण केले आहे. झालेल्या कामाची रक्कम रु.८,९७,९०,६७७/- इतकी होत आहे. महानगरपालिकेने अंदाजपत्रकात उपलबध जागेनुसार काम प्रस्तावित केले आहे. पावसाळ्यात काही भाग पाण्याखाली जाऊन रस्ता खराब होत असतो त्यामुळे नागरिकांच्या वारंवार तक्रारी महानगरपालिकेत येत असतात.

या अनुषंगाने प्रभारी शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी सदर रस्त्याची पाहणी केली. पाहणी दरम्यान सदर रस्ता अतिवृष्टीमुळे काही भागात क्षतिग्रस्त झाल्याचे दिसून आले. मंजूर निविदेप्रमाणे बी.बी.एम. वर डी.बी.एम. व बी.सी.ची तरतुद असल्याने तसेच पावसाचे पाणी वाहून जाणेकरीता संपुर्ण लांबीत गटार नसल्याने रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग खराब होण्याची शक्यता आहे. तथापी सदर रस्ता डांबरीकण न करता कॉंक्रिटचा केल्यास उपयुक्त होईल याबाबत पाहणी दरम्यान निश्चित करण्यात आले.

तद्नंतर सदर कॉंक्रिट कामाबाबत ठेकेदारास विचाराणा केली असता ठेकेदारांनी दि. ०४/०८/२०२६ च्या पत्रान्वये कॉंक्रीटरस्ता करणेस तयार असले बाबत कळविले आहे. तसेच नविन काम निविदा दरा नुसार (२०.७९% कमी दराने) करण्यास तयार आहेत. सदर कामामध्ये कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा समावेश करून रु.३०,२८,४४,४३६/-किंमतीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे.

मुळ अंदाजपत्रकामधील बाबींसाठी सन २०२२-२३ ची दरसुची प्रस्तावित होती. सुधारित अंदाजपत्रकासाठीही सन २०२२-२३ चीच दरसूची प्रस्तावित आहे. स्विकृत निविदा ही २०.७९% कमी दराने आहे. सद्य:स्थितीत MPM पर्यंतचे काम पुर्ण झाले असून झालेल्या कामाचे देयक रु. ८.९८ कोटी (GST सह) आहे. उर्वरीत काम कॉंक्रिटचे करावयाचे असल्याने स्विकृत निविदेशिवाय काही बाबी नव्याने प्रस्तावित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीप्रमाणे अतिरिक्त बाबी चालू दराने देय आहेत. तथापी कंत्राटदार स्विकृत दराने म्हणजेच २०.७९% कमी दराने काम करीत असल्याने या कामासाठी रु. ८.९८ कोटी (**२०.७९**% कमी दराने GST सह) व अतिरिक्त बाबींसाठीचे काम रु. २१.३० कोटी (**२०.७९**% कमी दराने GST सह) असे एकूण रु. ३०.२८ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

एकूण मूळ अंदाजपत्रकीय रक्कम	**रु. २१,०२,६३,६०८/-**
सेवा कर (१८% शासन परिपत्रक क्र. संकीर्ण / २०१७/ प्र.क्र. १२१ (भाग) / इमारती-२ दिनांक २७/०२/२०२२ अन्वये)	**रु.३,७८,४७,४४९/-**
कामगार विमा कर (१%)	**रु. २१,०२,६३६/-**
गौण खनिजाचे स्वामित्व धन व इतर तांत्रिक सल्लागार	**रु. १,०५,४७,०२२/-**
एकूण अंदाजपत्रकीय रक्कम	**रु. २६,०७,७५,६९७/-**

मंजूर कंत्राटदार २०.७९% कमी दराने काम करत असल्याने रु. ४.६३ कोटी (२०.७९% कमीचे) व त्यावरील GST गृहित धरून या कामामध्ये रु. ५.४६ कोटीची बचत होत आहे.

अ) सद्यस्थितीत पुर्ण केलेल्या बाबींचा खर्च

काम पूर्ण केलेल्या बाबीचा खर्च	**रु. ८,७२,३१,७३५/-**
निविदा अंदाजपत्रक दरसूचीनुसार ठेकेदाराच्या (-) २०.७९% कमी दराच्या मंजुरीनुसार येणारी रक्कम	**रु.१,८१,३५,४७८/-**
सेवा कर (१८% शासन परिपत्रक क्र. संकीर्ण / २०१७/ प्र.क्र. १२१ (भाग) / इमारती-२ दिनांक २७/०२/२०२२ अन्वये)	**रु. १,२४,३७,३२६/-**
कामगार विमा कर (१%)	**रु. ६,९०,९६३/-**
गौण खनिजाचे स्वामित्व धन व इतर	**रु. ७५,५८,८००/-**
मेटीरियल तपासणी रक्कम	**रु.७,३३०/-**
एकूण रक्कम	**रु.८,९७,९०,६७७/-**

ब) सुधारित अतिरिक्त बाबी

सदर कामामध्ये कॉक्रीटकरणाचे कामामध्ये लीन कॉक्रिट व पी.क्यु.सी., थर्मोप्लास्ट पेंट पट्टे, डक्टपाईप व इतर बाबीचा समावेश करावा लागणार आहे. खर्चातील होणाऱ्या वाढीचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

कॉक्रीट रस्ता	अंदाजित खर्च
वामन ढाबा ते संटेक ते DFCCब्रिज 1650 x८.०० व १.५० मी. पेव्हर	रु.२०,४४,९१,१०६/-
टीवरीगाव ते राजावली ते भोयदापाडा डम्पिंग ग्राउंड ३९८०x ६.००	
डम्पिंग ग्राउंड ते सातिवली मुख्य रस्ता ५३०.०० x १४.००	
नविन पाईप गटार	**रु. १,८३,५८,५७५/-**
एकूण	**रु.२२,२८,४९,६८१/-**
निविदा अंदाजपत्रक दरसूचीनुसार ठेकेदाराच्या (-) २०.७९ % कमी दराच्या मंजुरीनुसार येणारी रक्कम	**रु.४,६३,३०,४४९/-**
	रु. १७,६५,१९,२३२/-
सेवा कर (१८% शासन परिपत्रक क्र. संकीर्ण / २०१७/ प्र.क्र. १२१ (भाग) / इमारती-२ दिनांक २७/०२/२०२२ अन्वये)	**रु. ३,१७,७३,४६२/-**
कामगार विमा कर (१%)	**रु.१७,६५,१९२/-**
गौण खनिजाचे स्वामित्व धन व इतर	**रु. २९,८८,२२३/-**
मेटीरियल तपासणी रक्कम	**रु.७,६५०/-**
एकूण रक्कम	**रु.२१,३०,५३,७५९/-**

वरील सद्यस्थितीत पूर्ण झालेल्या कामाचा
एकूण खर्च (-२०.७९% ने) :- ८,९७,९०,६७७/- व
कॉक्रीटरस्ता करणेसाठी सुधारीत होणारा
खर्च (-२०.७९% ने) :- **२१,३०,५३,७५९/-**
कामावर होणारा एकूण खर्च :- ३०,२८,४४,४३६/-

सदरचा खर्च अर्थसंकल्पातील ''रस्ता बांधकामे'' या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२६-२७ या वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीनुसार करण्यात येईल. चालू आर्थिक वर्षात सुधारीत अर्थसंकल्पाव्दारे योग्य ती तरतूद करण्याची दक्षता घेण्यात येईल तसेच वित्तीय वर्ष २०२७-२८ च्या अर्थसंकल्पात सदर कामाकरीता आवश्यक ती तरतुद करण्यात येईल.

यापूर्वीची प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.२६,०७,७५,६९७/- व सुधारीत कामावर होणारा एकूण खर्च रु.३०,२८,४४,४३६/- होणार आहे. तरी वाढीव एकूण खर्च रु.४,२०,६८,७३९/- इतका होणार आहे. तरी रक्कम रु.३०,२८,४४,४३६/- रक्कमेची सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळावी तसेच सदरचे काम मूळ ठेकेदारकडून अंदाजपत्रकीय किंमतीच्या२०.७९% कमी दराने करण्यास मंजुरी मिळावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४, दि. २०/०९/२०१० नुसार मा. महासभेपुढे मा. आयुक्त यांच्या मंजुरीस्तव सादर केले आहेत. सदर कामाकरीता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाही पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्यावेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८,९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव (पु) वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.२६,०७,७५,६९७/- व सुधारीत कामावर होणारा एकूण खर्च रु.३०,२८,४४,४३६/- होणार आहे. तरी वाढीव एकूण खर्च रु.४,२०,६८,७३९/- इतका होणार आहे. तरी रक्कम रु.३०,२८,४४,४३६/- रक्कमेची सुधारीत रक्कमेस तसेच सदरचे काम मूळ ठेकेदारकडून अंदाजपत्रकीय किंमतीच्या२०.७९% कमी दराने करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्प्यावरील कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

ठराव / निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव (पु) वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.२६,०७,७५,६९७/- व सुधारीत कामावर होणारा एकूण खर्च रु.३०,२८,४४,४३६/- होणार आहे. तरी वाढीव एकूण खर्च रु.४,२०,६८,७३९/- इतका होणार आहे. तरी रक्कम रु.३०,२८,४४,४३६/- रक्कमेची सुधारीत रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच सदरचे काम मूळ ठेकेदारकडून अंदाजपत्रकीय किंमतीच्या २०.७९% कमी दराने करण्यास मा. सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सुचक - (कन्हैया भोईर)

अनुमोदक - (प्रफुल्ल साने)

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए ते आय कार्यक्षेत्रातील (NCAP अंतर्गत) विविध ठिकाणी रस्ते आणि रस्त्याच्या कडांच्या (sidepatti) सुधारणेचे काम करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१) अंदाजपत्रकीय रक्कम : रु.१२,१९,३७,२३७/-

२) कामाची आवश्यकता : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए,बी.सी,डी,ई,एफ,जी,एच व आय अंतर्गत विविध डांबरीकरण केलेले रस्ते आहे. वसई विरार भूप्रदेश हा अति पर्जन्यशील क्षेत्रामध्ये येत असून दरवर्षी दरम्यान सुमारे ३००० ते ३५०० मी.मी इतकी विक्रमी पावसाची नोंद होते. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिवृष्टी निर्माण होते.

तसेच पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते व काही ठिकाणी रात्स्यालागत गटार नसल्याने रस्त्यावरील पाण्याचा निचरा योग्य त्या वेळेत होत नाही. पाण्याचा निचरा न झाल्याने नागरिकांना वाहतुकीच्या वेळेत विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्याप्रमाणे रस्त्यास साईडपट्टी नसल्याने धुळीचे प्रमाणात देखील वाढ होत असते. तसेच मा.आयुक्त यांचे दि.०३/०२/२०२६ रोजीच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत आढावा बैठकीत धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रस्त्यांच्या सुधारणांची कामे End to End paving करणेबाबत सूचना देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने शासन निर्णय क्र.एफएफसी-२०२६/प्र/क्र.३९/नवि-४ दि.२५/०३/२०२६ अन्वये रक्कम रु.१,३९,००,०००/- ची मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र.एफएफसी-२०२६/प्र/क्र.४०/नवि-४ दि.२५/०३/२०२६ अन्वये रक्कम रु.९,७३,००,०००/- ची मंजुरी देण्यात आलेली आहे व शासन निर्णय क्र.एफएफसी-२०२६/प्र/क्र.४०/नवि-४ दि.२५/०३/२०२६ अन्वये रक्कम रु.१९,००,००,०००/- ची मंजुरी देण्यात आलेली आहे. असे एकूण रक्कम रु.३०,१२,००,०००/- करीता मंजुरी देण्यात आलेली आहे. मा.आयुक्त यांचे दि.०३/०२/२०२६ रोजीच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम आढावा बैठक इत्तीवृत अंतर्गत रक्कम १२ कोटी इतंके रक्कमेचे प्रस्ताव तयार करण्याबाबत सूचना होते.

त्या अनुषंगाने नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सदर रक्कम रु. १२ कोटी हे राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत प्राप्त फंडातून खर्च करण्यात येत असून उर्वरीत रक्कम १९,३७,२३७/- हे महानगरपालिका फंडातून खर्च करण्यात येत आहे.

कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे व परिमाण :- खोदाई (७७७८.२१ घन मी),
सोलिंग (५४२७.७४ घन मी),
पी.सी.सी. (४५१८.४९ घन मी),
८० मी.मी जाडीचे पेव्हर ब्लॉक (१८१८४.९० चौ.मी),
कोपिंग (१७३८.९४ घन मी),
जी.एस.बी (२५९०.९५ घन मी),
ए.पी.एम.(२७०० चौ.मी),
टॅक कोट (१८०० चौ मी),
बी.एम. (११२.५० घन मी),
बी.सी (६.२५) घन मी),

एम-४० ग्रेड पीक्यु.सी (१५३.१२ घन मी) व (डीस्पोसिंग (७७७८.२१ घन मी)

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापुर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.

अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष : इतर विकास कामे

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव निर्णय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए ते आय कार्यक्षेत्रातील (NCAP अंतर्गत) विविध ठिकाणी रस्ते आणि रस्त्याच्या कडांच्या (sidepatti) सुधारणेचे काम करणे या विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.१२,१९,३७,२३७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकात ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी शासनाकडुन अनुदान/ निधी उपलब्ध झाल्यास सदरच्या निधीतुन काम करणेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत आहे. अनुदान/ निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका निधीतुन सदरचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवुन निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - स्वप्निल कवळी

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिवाणमान, नवघर, तुळींज, आचोळे, फुलपाडा आणि विराटनगर या एकूण ६ ठिकाणी इको फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमींमध्ये सध्या अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणावर लाकडांचा वापर केला जात आहे. एका अंत्यसंस्कारासाठी सरासरी सुमारे ४५० कि.ग्रॅ. लाकडांची आवश्यकता भासते. लाकडांचा हा मोठ्या प्रमाणातील वापर पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक असून त्यातून वायू प्रदूषणातही वाढ होत आहे.

केंद्र शासनामार्फत शहरांतील वायू प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने "राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम" अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील स्मशानभूमींमध्ये इको-फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. या यंत्रणेद्वारे एका अंत्यसंस्कारासाठी कमी लाकडांची आवश्यकता भासत असल्याने लाकडाच्या वापरात लक्षणीय बचत होईल. तसेच वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन पर्यावरण संवर्धनासही हातभार लागेल. गॅसिफिकेशन तंत्रज्ञानावर आधारित या इको फ्रेंडली अंत्यसंस्कार प्रणालीमध्ये पारंपरिक चितेसाठी लागणाऱ्या सुमारे ४५० कि.ग्रॅ. लाकडाच्या तुलनेत केवळ सुमारे १२५ कि.ग्रॅ. लाकडाची आवश्यकता भासते. ही प्रणाली नैसर्गिक ड्राफ्ट (Natural Draft) तत्त्वावर कार्यरत असल्याने अंत्यसंस्कार प्रक्रियेसाठी बाह्य वीजपुरवठ्याची गरज नाही. यामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेले स्क्रबिंग युनिट सौरऊर्जेवर चालते. दहन प्रक्रियेत निर्माण होणारे फ्ल्यू गॅसेस चार टप्प्यांच्या गाळणी प्रक्रियेतून (Four-Stage Filtration) पार केल्यानंतर १०० फूट उंच चिमनी द्वारे उत्सर्जित केले जातात. ही संपूर्ण प्रणाली स्वयंशाश्वत स्वरूपाची आहे. तसेच अंत्यसंस्कार प्रक्रिया सर्व हिंदू धार्मिक विधी पूर्ण केल्यानंतरच केली जात असल्याने व्यक्तीच्या धार्मिक श्रद्धेचा व परंपरेचा पूर्णपणे सन्मान राखला जातो. या प्रणालीमध्ये एका अंत्यसंस्कारासाठी केवळ सुमारे दीड तास लागतो, तर पारंपरिक खुल्या चितेसाठी साधारणतः ४ ते ५ तास लागतात. लाकडाचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे हरितगृह वायू (GHG) उत्सर्जनामध्ये सुमारे ६० % पर्यंत घट होते. तसेच, या प्रक्रियेनंतर केवळ सुमारे २ % अवशेष शिल्लक राहतात, तर पारंपरिक खुल्या चितेमध्ये सुमारे २५ % अवशेष निर्माण होतात, त्यामुळे घनकचऱ्याचे प्रमाण व त्याच्या पुनर्वापराची आवश्यकता लक्षणीयरीत्या कमी होते. ही भट्टी गॅसिफिकेशन तंत्रज्ञान आणि उष्मागतिकी तत्त्वांवर आधारित असल्यामुळे इंधनाचा अधिक कार्यक्षम वापर, प्रभावी दहन आणि कमी प्रदूषण साध्य होते. त्यामुळे या इके फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविल्यास आर्थिक दृष्ट्या बचत हेण्यास तसेच प्रदूषण कमी करण्यास मोठी मदत होणार आहे.

वरील बाबी लक्षात घेता वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात दिवाणमान, नवघर, तुळींज, आचोळे, फुलपाडा आणि विराटनगर या एकूण ६ ठिकाणी इको-फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणे कामी अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रक तयार कारणेकामी दरसूचीमध्ये समावेश नसलेल्या बाबींचे दर कोटेशन पद्धतीने मागविण्यात आले होते. प्राप्त दरांच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडील मंजूर तांत्रीक सल्लागारामार्फत खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रु.
१	वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिवाणमान, नवघर, तुळींज, आचोळे, फुलपाडा आणि विराटनगर या एकूण ६ ठिकाणी इको फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणे.	रु. १०,४७,३४,६६४/-

वरील कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेला आहेत
तरी सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिवाणमान, नवघर, तुळींज, आचोळे, फुलपाडा आणि विराटनगर या एकूण ६ ठिकाणी इको फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका शहरास लाभलेल्या समुद्र किनाऱ्यावर SS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रास अंदाजित १६ कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. समुद्र किनाऱ्यावर नागरीक व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. आपल्या महानगरपालिका क्षेत्रातील सुरुची बाग, राजोडी बीच, भुईगाव बीच हे अत्यंत महत्त्वाचे आणि लोकप्रिय पर्यटन क्षेत्र आहे. येथे दररोज स्थानिक नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि हजारो पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असतात. विशेषत: सुट्ट्यांच्या दिवशी आणि संध्याकाळच्या वेळी येथे प्रचंड गर्दी असते. त्या अनुषंगाने समुद्र किनाऱ्यावर MS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

डस्टबिन :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार महानगरपालिकेवर शहरातील सार्वजनिक स्वच्छता राखणे, घनकचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करणे तसेच सार्वजनिक आरोग्य व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना राबविण्याची वैधानिक जबाबदारी आहे. पर्यटकांकडून प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, अन्नपदार्थांचे वेष्टन, थर्माकोल, कागद व इतर घनकचरा किनाऱ्यावर टाकला जात असल्याने समुद्र किनाऱ्यांचे सौंदर्य बाधित होते. तसेच पर्यावरणीय प्रदूषण निर्माण होते.

समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता अबाधित राखण्यासाठी, कचरा विखुरण्यास प्रतिबंध करण्यासाठी, पर्यावरण संवर्धनास चालना देण्यासाठी तसेच नागरिक व पर्यटकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने समुद्रकिनाऱ्यालगत आवश्यक त्या सर्व ठिकाणी टिकाऊ, मानक दर्जाचे, हवामानास प्रतिरोधक व ओला-सुका कचरा वर्गीकरणासाठी स्वतंत्र डस्टबिन उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने समुद्र किनारे स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी तसेच स्वच्छ भारत अभियान उपक्रमाच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशा संख्येने डस्टबिन उपलब्ध करणे अत्यावश्यक आहे.

वॉच टॉवर :-

1.नागरिकांच्याजीविताचे संरक्षण:

समुद्रातील भरती - ओहोटी, मोठ्या लाटा, रिप करंट (Rip Current), खोल पाणी तसेच अचानक निर्माण होणाऱ्या धोकादायक परिस्थितीमुळे बुडण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. उंच वॉच टॉवरवरून लाइफगार्ड किंवा बचाव पथकाला संपूर्ण किनाऱ्यावर प्रभावीपणे लक्ष ठेवता येते. त्यामुळे धोका ओळखून तात्काळ बचावकार्य सुरू करता येते आणि जीवितहानी टाळण्यास मदत होते.

2.आपत्कालीनप्रतिसादाची गतीवाढते:

समुद्रात अडकलेली व्यक्ती, बुडणारे पर्यटक, हरवलेली मुले, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा इतर दुर्घटना दिसताच वॉच टॉवरवरील कर्मचारी त्वरित संबंधित यंत्रणांना माहिती देऊ शकतात. त्यामुळे आपत्कालीन प्रतिसादाचा वेळ कमी होतो.

3.कायदाव सुव्यवस्थाराखणे:

समुद्रकिनाऱ्यावर मद्यपान, धूम्रपान, असामाजिक कृत्ये, भांडणे, महिलांची छेडछाड, संशयास्पद हालचाली तसेच सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड यांसारख्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वॉच टॉवर प्रभावी ठरतो. पोलीस व सुरक्षा यंत्रणांना देखील त्याचा उपयोग होतो.

4.पर्यटकांच्यासुरक्षिततेत वाढ:

पर्यटनस्थळ म्हणून समुद्रकिनाऱ्याची विश्वासार्हता व आकर्षकता वाढविण्यासाठी सुरक्षित वातावरण आवश्यक असते. वॉच टॉवरमुळे पर्यटकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते, ज्यामुळे पर्यटनालाही चालना मिळते.

5.नैसर्गिकआपत्तींच्या वेळीउपयोग:

चक्रीवादळ, अतिवृष्टी, उंच लाटा, त्सुनामीचा इशारा किंवा इतर नैसर्गिक आपत्तींच्या वेळी किनाऱ्यावरील परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून नागरिकांना तात्काळ सूचना देता येतात तसेच सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यास मदत होते.

6.शोधव बचावकार्यअधिक परिणामकारकहोते:

समुद्रात वाहून जाणारी व्यक्ती, बोट किंवा इतर वस्तूंचा शोध घेणे वॉच टॉवरवरून अधिक सुलभ होते. बचाव पथकाला योग्य दिशा व स्थान निश्चित करण्यात मदत मिळते.

सार्वजनिक शौचालय :-

सध्या वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रा लगत असलेल्या समुद्र किनाऱ्यावर पुरेशा प्रमाणात आणि चांगल्या दर्जाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची (Toilets/Washrooms) सोय उपलब्ध नाही. यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची, विशेषत: महिला व लहान मुलांची मोठी गैरसोय होते. तसेच उघड्यावर शौचास बसल्यामुळे किनाऱ्यावर अस्वच्छता पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. समुद्र किनाऱ्याची स्वच्छता, सुरक्षितता व सौदर्यीकरण राखण्यासाठी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

सदर कामासाठी अंदाजित खर्च निश्चित करणे, तसेच नियमानुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यासाठी संबंधित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदार यांना दि. १८/०६/२०२६ रोजीच्या पत्राने कळविण्यात आलेले होते. त्यानुसार खालील संस्थांनी आपली दरपत्रके बंद लिफाफ्यात सादर केलेली आहे त्याचा दर खालीलप्रमाणे आहेत.

तक्ता क्र. १

अ. क्र.	वस्तूचे वर्णन	प्रमाण	मे . सेलेक्स (इंडिया) (दर GST सह)	मे. फन प्ले सिस्टीम्स प्रा. लि. (दर GST सह)	मे. बोरकर पॉलिमर्स (दर GST सह)	मे. श्री समर्थ इंजीनीरिंग को. (दर GST सह)
१	SS Dustbin	१	१,२७,४४०/-	१,१२,१००/-	८२,६००/-	६५,९६२/-
२	GI Watch Tower	१	१४,५८,४८०/-	१६,५२,०००/-	१२,९८,०००/-	-
३	सार्वजनिक शौचालय	१	३३,६३,०००/-	३१,०९,३००/-	२४,७८,०००/-	-

वरीलपैकी लघुत्तम दरासाठी मान्यता घेण्यात येईल तथापि जाहीर ई-निविदेनंतर जे दर प्राप्त होतील त्यातील लघुत्तम दराशी तुलना करण्यात येईल.

उपरोक्त चार कंपन्यांनी विहीत मुदतीत आपली दरपत्रके बंद लिफाफ्यामध्ये सादर केलेली असून सदर लिफाफे उघडून प्राप्त दरांचे तुलनात्मक विवरणपत्र तयार करुन कमी दर सादर केलेल्या कंपनीस मान्यता मिळणेकरिता मे. श्री समर्थ इंजीनीरिंग को. यांचे SS Dustbin तर मे. बोरकर पॉलिमर्स यांचे GI Watch Tower , सार्वजनिक शौचालय व बैठक व्यवस्थाचे दर न्युनतम व रास्त (कमी) दराची असून SS Dustbin प्रती नग रू. रु. ६६,०००/- GI Watch Tower प्रती नग रू. १२,९८,०००/-, सार्वजनिक शौचालय प्रती नग रू. २४,७८,०००/- रु. आहे. सदरची न्युनतम रक्कम गृहीत धरुन SS Dustbin – १०० नग, GI Watch Tower – ४ नग, सार्वजनिक शौचालय - ३ नगा करिता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

तक्ता क्र. २

अ. क्र.	वस्तूचे वर्णन	प्रमाण	मे . सेलेक्स (इंडिया) (दर GST सह)	मे. फन प्ले सिस्टीम्स प्रा. लि. (दर GST सह)	मे. बोरकर पॉलिमर्स (दर GST सह)	मे. श्री समर्थ इंजीनीरिंग को. (दर GST सह)
१	SS Dustbin	१००	१,२७,४४०००/-	१,१२,१०००/-	८२,६०००/-	**६५,९६,२००/-**
२	GI Watch Tower	४	५८,३३,९२०/-	६६,०८,०००/-	**५१,९२,०००/-**	-
३	सार्वजनिक शौचालय	३	१,००,८९,०००/-	९३,२७,९००/-	**७४,३४,०००/-**	-

तक्ता क्र. २ नुसार SS Dustbin – १०० नगा करिता रक्कम **रु. ६५,९६,२००/-**, GI Watch Tower – ४ नगा करिता रक्कम **रु. ५१,९२,०००/-**, सार्वजनिक शौचालय - ३ नगा करिता रक्कम रु. **७४,३४,०००/-** अशी एकुण रक्कम **रु. १,९२,२२,२००/-** एवढा खर्च होणार आहे. त्या अनुषंगाने MS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय खरेदी करणेकामी एकूण रक्कम रु. **१,९२,२२,२००/- (अक्षरी एक कोटी ब्याण्णव लाख बावीस हजार दोनशे रु.)** इतका अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.वरील बाबीमध्ये आवश्यकतेप्रमाणे वाढ अथवा घट करण्यात येईल. सदरचा खर्च **घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नाले सफाई या लेखाशिर्ष संकेतांक ३४०-२५५०-१** मधून भागविण्यात येईल.

तरी, समुद्र किनाऱ्यावर MS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणाऱ्या रक्कम रु. **१,९२,२२,२००/- (अक्षरी एक कोटी ब्याण्णव लाख बावीस हजार दोनशे रु.)** खर्चास मा. महासभेची प्रशासकिय व वित्तिय मान्यता देऊन सदर निविदा स्वतंत्र काढण्यास मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव निर्णय :- घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वसई-विरार शहर महानगरपालिका शहरास लाभलेल्या समुद्र किनाऱ्यावर SS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत या विषयाचे वाचन सभागृहात करणेत आले. त्या अनुषंगाने मेरिटाईम बोर्डाची परवानगी घेऊन तात्पुरते शौचालय सेवाभावी संस्थांना देण्यात यावे. तसेच पे ॲन्ड युज माध्यमातून शौचालयाचे काम करण्यात यावे. मेरिटाईम बोर्ड आणि बंदर विभाग यांनी स्वत: वॉच टॉवर बनविण्याचे काम सुरु केलेले आहे. त्यामुळे आपणास वॉच टॉवर बनविण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत विभागाने माहिती घ्यावी. डस्टबिन बनविण्यासाठी काही रिसॉर्टवाले तयार आहेत. त्यांच्याकडून ते करण्यात यावे.

अशा सूचना विभागाला देण्यात आल्या. तसेच सदरची कामे बीना खर्च झाली नाही तर आवश्यक बाबींच्या निविदा प्रक्रिया राबविणेस आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - रंजना थापेकर

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी निविदा काढून २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन खरेदी करणेस प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मसुदा :- केंद्र शासन स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर दि. १५ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) अंमलबजावणी सुरु आहे. या अभियांनातर्गत शहरे हगणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत "स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबीचा समावेश आहे.

राज्यात नागरी घनकचरा व्यवस्थापनाकरिता आतापर्यंत उभारण्यात आलेल्या प्रकल्पावरुन असे लक्षात आले आहे की, नागरी घनकचऱ्याचे विलगीकरण न करता त्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प यशस्वी होत नाहीत. नागरी घनकचऱ्याचे विलगीकरण केल्याशिवाय घनकचऱ्यास मुल्य प्राप्त होत नाही. यास्तव नागरी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचरा निर्मितीच्या जागीच घनकचऱ्याचे विलगीकरण करणे (at source waste segregation) अत्यावश्यक आहे. यास्तव शासन परिपत्रक क्र. स्वमअ २०१/प्र.क्र.६०/नवि.३४ दि.१६ मे २०१७ व समक्रमांक दि. १० एप्रिल २०१७ चे शासन परिपत्रकान्वये राज्यामधील सर्व शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segregation) करण्याची मोहिम राबविणे अनिवार्य करणेत आले आहे.

सदर घनकचरा विलगीकरण मोहिम राबविण्याबाबत शासन परिपत्रकान्वये सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने अमृत अभियानात समाविष्ट राज्यातील सर्व शहरांनी शहरात निर्माण होणाऱ्या एकूण घनकचऱ्यापैकी ३०% घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segregation) करण्याची कार्यवाही करावी. याबाबत सुचना करण्यात आल्या आहेत. तथापि याबाबत नागरीकांनी कचरा निर्मितीचे ठिकाणी ओला, सुका, ई-वेस्ट व घातक कचरा घरोघरी विलगीकरण करणे गरजेचे असताना मनपाने सुध्दा त्यासाठी स्वतंत्रपणे अनुक्रम हिरवे, निळे लाल रंगाचे कचरा डब्बे सोसायटींना पुरविणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे, क्षेपणभुमीवर वाहतुक करणे तसेच रस्ते व गटार सफाई करणेकामी दि.१२/१२/२०२५ रोजीच्या ठराव क्र. १७८६ ते १७९४ अन्वये मे. अमृत एंटरप्रायजेस, मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट लि. व मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लि. यांना दि. ०९/०१/२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कामामध्ये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकते अनुसार डस्टबिन वाटप करणेचे काम अंतर्भुत आहे. वरील ठेकेदारास मनपा कार्यक्षेत्रात सर्वे करून डस्टबिनची आवश्यकतेनुसार संख्येकित अहवाल मागविण्यात आला होता. परंतु सदर ठेकेदारामार्फत कोणताही अहवाल सादर करण्यात आले नाही.

सद्यस्थितीत अंदाजित एकूण ७,७०,८९४ रहिवाशी मालमत्ता व १,३४,८४८ वाणिज्य मालमत्ता असे एकूण ९,०५,७४२ मालमत्तांची संख्या असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणत वाढ झालेली आहे. वाढलेल्या इमारतींची संख्या लक्षात घेता. दैनंदीन निर्माण होणाऱ्या कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच मनपाचे मंजूर सफाई ठेकेदार यांचेमार्फत आतापर्यंत ४०० डस्टबीनचे वाटप करण्यात आले असून आणखी ६०० डस्टबीन मागविण्यात आल्याचे कळविले आहे. परंतु सदर डस्टबिन पुरवठा पुरेसा नसल्याने कचरा संकलनासाठी नागरिक व नगरसेवक यांचेकडून मोठ्याप्रमाणत २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीनची मागणी होत आहे. तसेच नागरीकांचा याबाबत रोष आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता सद्यस्थितीत अंदाजित १०,००० नग २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन खरेदी करणे आवश्यक आहे. नविन डस्टबीन खरेदी करताना सदरील डस्टबीनचा बाजार भाव खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. २

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	दर प्रति नग
१	मे. सेलो कन्झ्युमर प्रोडक्ट प्रा.लि.	३५२८.२०/-
२	मे. एरिस्टोप्लास्ट प्रोडक्ट प्रा. लि.	३५७८.००/-
३	मे. निलकमल	३६८९.००/-

वरील प्रमाणे मे. सेलो कन्झ्युमर प्रोडक्ट प्रा.लि. यांच्या डस्टबिन चे लघुत्तम दर रक्कम रू. ३५२८.२०/- प्रती नग इतका दर गृहीत धरल्यास **५,००० निळे, ५,००० हिरवे असे एकूण १०,०००** डस्टबीनसाठी **रक्कम रु.३,५२,८२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी बावन्न लक्ष ब्याऐंशी हजार मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नाले सफाई या लेखाशिर्ष संकेतांक ३४०-२५५०-१ मधुन भागविणे शक्य आहे. तरी २४० लिटर क्षमतेच्या **५,००० निळे, ५,००० हिरवे असे एकूण १०,०००** नग HDPE डस्टबीन्स खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणारा खर्च हा वरील लेखाशिर्षामधून करावा किंवा दि.१२/१२/२०२५ रोजीच्या ठराव क्र. १७८६ ते १७९४ नुसार ठेकेदाराकडून वसुल करावा याबाबत मा. सर्वसाधारण सभेपुढे प्राथमिक मंजूरी मिळणेस पुढील ठराव करणेत येत आहे.

निर्णय :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी निविदा काढून २४० लिटर क्षमतेच्या १०,००० नग HDPE डस्टबीन खरेदी करणे या विषयाबाबत मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रशासकिय मान्यता मिळणेबाबतच्या विषयाचे वाचन करण्यात आले.
शहराच्या आवश्यकतेनुसार मा. सर्वसाधारण सभेत सर्वानुमते झालेल्या निर्णयानुसार **१०,००० निळे, १०,००० हिरवे असे एकुण २०,००० डस्टबिन** खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणारा खर्च **रक्कम रु.७,०५,६४,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात कोटी पाच लक्ष चौसष्ठ हजार मात्र)** दि.१२/१२/२०२५ रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. १७८६ ते १७९४ नुसार ठेकेदाराकडून वसुल करावा याबाबत मा. सर्व साधारण सभा प्रशासकिय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ला सोने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रीस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेस सन २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९ या त्रैवार्षिक वर्षाकरिता ई-निविदा मागवून क्लिन अप मार्शलची नेमणूक करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्राचा भौगोलिक विस्तार, वाढती लोकसंख्या, नागरीकरणाचा वेग आणि स्वच्छता व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता सार्वजनिक स्वच्छता राखणे ही महानगरपालिकेसमोरील एक महत्त्वाची जबाबदारी आहे. महानगरपालिकेमध्ये स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुल करण्यासाठी सन २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ या त्रैवार्षिक वर्षाकरिता स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आलेली असून महानगरपालिकेमध्ये स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये दंडात्मक कारवाई करून प्रशासकीय ठरावानुसार मंजूर करून निश्चित केलेल्या खालीलप्रमाणे दराने प्रशासकीय शुल्क वसुल करणेत येते .

तक्ता क्र.१

अ. क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१	सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये	रु.२००/-
२	खाजगी मालमत्तेच्या जागी कचरा टाकणे		रु.२००/
३	वाहनांतून फेकला जाणारा कचरा		रु.२००/
४	वाहतुकीच्या वाहनांतुन फेकला जाणारा कचरा		रु.२००/
५	सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे		रु.१००/-
६	सार्वजनिक ठिकाणी थुंकणे		रु.२००/-
७	सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जित करणे		रु.२००/-
८	सार्वजनिक ठिकाणी प्राणी किंवा पक्ष्यांना		रु.५००/-

अ. क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
	खाण्यास देणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये	
९	सार्वजनिक ठिकाणी वाहने, अन्य कोणत्याही वस्तू दुरुस्त करणे		रु.५००/-
१०	वर्गीकरण न केलेला व वेगवेगळा न साठविलेला घनकचरा प्रती व्यक्तीस		रु.१००/-
११	अधिकांश कचरा उत्पादक म्हणजे मालक, दुकानदार, भोगवटादार, गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मालक किंवा भोगवटादाराच्या वतीने प्रतिनिधित्व करणारी कोणतीही व्यकी, उपहारगृह, हॉटेल्स, बाजार, फेरीवाले, दवाखाने, औद्योगिक मालमत्ता आणि व्यापारी संकुले/मॉल्स, शैक्षणिक संस्था यामध्ये कोणतीही सरकारी किंवा सार्व. कार्यालये, इमारत किंवा अन्य वापरकर्ते जसे क्लब, जिमखाने, युवा कार्यालये, शैक्षणिक संकुले, इस्पितळे इत्यादी व्यवसायाचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणे.		रु.३००/-
१२	जैविक कचरा वर्गीकरण न करुन देणे.		रु.१००/-
१३	प्रक्रिया न केलेला जैव वैद्यकीय कचरा साठवणूक करणे		१० किलो - रू. ५०/- १० ते ५०० किलो - रू. १०/- प्रति किलो
१४	बांधकाम आणि निष्कासनातून निर्माण होणारा कचरा, दगड, माती, राडा-रोडा, वाळू, विटा		एक ब्रास दगड, माती, राडारोडा वाळू, रू. २५००/- प्रमाणे

अ. क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
	सार्वजनिक ठिकाणी टाकणे		विटा नग १ ते १००० नग रू. २५००/- विटा नग १००० नग ते अधिक रू. २५००/- प्रमाणे.
१५	सुका कचरा साठवणूक करणे		रु.१००/-
१६	खाजगी इमारतीमधील मोठी उद्याने आणि बागबगीचा मधील कचरा तसेच खाजगी मोकळया जागेत कचरा टाकणे व साठविणे		रु.३००/-
१७	रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकाराचा घन कचरा जाळणे		रू.२००/-
१८	कोंबडया, मासळी, कत्तलीचा कचरा		पहिल्या १० किलो साठी रू.५००/- व त्या पुढील रू. २० प्रमाणे प्रति किलो.
१९	सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी मोकळया जागी/दुकानाबाहेर उघड्यावर मांस विक्री केल्यास		रू. ३०००/-
२०	सर्व विक्रेते/फेरीवाले, त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा		रु.५००/-
२१	सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर मालकीच्या/पाळीव प्राण्यांपासून होणारा कचरा		रु.२००/-

अ. क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
२२	रस्त्यावर वाहने उभी केल्यास सदर वाहनाखालची जागा अथवा रस्त्याचा भाग साफ न करणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये	रु.२००/-
२३	महापालिकेची परवानगी न घेता भिंतीवर भिंतीपत्रके अथवा चित्रे लावणे		एक पोस्टर बॅनरसाठी रु.२००/-
२४	सार्वजनिक रस्ता/फुटपाथ गटारी वर अतिक्रमण करुन अस्वच्छता निर्माण करणे.		रु.१,०००/-
२५	प्रत्येक पानपट्टीधारकाने स्वतंत्र कचरा पेटी ठेवणे आवश्यक		रू. २००/-
२६	सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करून रहदारीला अडथळा निर्माण केल्यास आकारावयाच्या दंडाची रक्कम		रू. १०००/-

तसेच, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यामुळे सार्वजनिक मालमत्ता विद्रुप होते व विद्रुप झालेल्या भिंती पुन्हा-पुन्हा रंगविण्यासाठी जनतेने कर स्वरुपात दिलेला पैसा खर्च करणे प्रशासनास भाग पडत आहे. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो व त्याचे सेवन केल्याने कर्करोग,श्वसन आजार, पुनरुत्पादन संस्थेचे आजार, पचनसंस्थेचे आजार यांसारख्या प्राणघातक आजारांचा फैलाव होतो. याबाबत अतिदक्षता घेऊन सर्व जनतेच्या हितास्तव प्रतिबंधक उपाययोजना करणेकामी शासन निर्णयानुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, सुपारी, पान, 'पानमसाला, गुटखा तसेच इतर तंबाखुजन्य पदार्थांच्या सेवनास/थुंकण्यास व धुम्रपानास (सिगारेटसह) प्रतिबंध करण्यात आला आहे. याचे उल्लंघन करणाऱ्यावर साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ यांचे उल्लंघन केल्यास खालील नमूद तक्त्यानुसार दंड आकारणे निश्चित केले आहेत.

तक्ता क्र.२

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१	सार्वजनिक ठिकाणी पान खाऊंन थुंकणे	जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण यांचे विनियमन कायदा २००६ च्या कलम ३१ द्वारे	रु.१००/-
२	सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे		रु.१००/-
३	सार्वजनिक ठिकाणी गुटखा खाणे		रु.१००/-
४	धार्मिक/शैक्षणीक संस्था, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणापासुन १०० मीटर परिसरात पान, तंबाखू, गुटखा व सिगारेट विक्री व साठवणूक		रु.५००/-

उपरोक्त नुसार प्रशासकीय ठरावानुसार मंजूर करून निश्चित केलेल्या दराने तसेच प्रशासकीय ठराव क्र. ८८३, दि. ३०/०६/२०२३ रोजी अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थांचे प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुल करण्यासाठी सन २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ या त्रैवार्षिक वर्षाकरिता स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेस आलेल्या मनपास ६९% व निविदाधारकास ३१% एवढ्या दरास मंजुरी नुसार अभिकर्त्यामार्फत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे काम अखंडीतपणे चालू आहेत.

तथापि, घनकचरा अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध नियमान्वये खालील बाबींवर दंड आकरणेबाबत नमूद आहे.

तक्ता क्र. ३

अ.क्र.	दंडाचा प्रकार	अधिसुचना	आकारण्यात येणारे दंड (रू.)
१.	१२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे व हँडल असलेले सर्व प्रकारचे प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिकचे आवरण असलेले सर्व प्रकारचे एकल वापर डिस्पोसेबल वस्तु (ताट, ग्लास, ताटे, चमचे, काटे, वाटी इ.), अन्न पदार्थ पॅकेजिंगसाठी वापरले जाणारे वस्तु, नॉनओव्हन पॉलिप्रॉपिलेन बॅग्स, थर्माकॉल (पॅकेजिंग वगळून) इ. वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, साठवणुक करणारे	महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ व याबाबतचे सुधारीत नियमान्वये	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रू. १०,०००/- (दुसरा प्रसंग) रू. २५,०००/- व ३ महिने कारावास (तिसरा प्रसंग)
२.	सेप्टिक टँक मधला मलजल अनधिकृतपणे उघड्यावर टाकणे.	हागणदारी मुक्त (ODF) च्या मार्गदर्शिकानुसार	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रु. १०,०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
३.	ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे. (निवासी व वाणिज्य आस्थापना)	घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी	रू. २००/- (पहिला प्रसंग) रू. ३००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
४.	मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWGs) यांचेमार्फत ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे.		रू. ३०००/- (पहिला प्रसंग) रू. ९०००/- (पुढील

			प्रत्येक प्रसंगी
५.	कचरा जाळणेबद्दल		रू. ५०००/-

उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद दंडानुसार हागणदारी मुक्त (ODF) च्या मार्गदर्शिकानुसार तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी तसेच महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमांनुसार मनपा क्षेत्रात प्रभावि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

परंतु, तक्ता क्र. १ मधील अनुक्रमणिका १०, ११, १२ व १७ मध्ये नमूद तपशिलामध्ये तक्ता क्र. ३ अन्वये सुधरणा करणे अपेक्षीत आहे. तसेच सदर तक्ता क्र. १ मध्ये अनुक्रमणिका १० व १२ मध्ये नमूद दंडाचा प्रकार शब्दश: एकच असल्यामुळे त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच तक्ता क्र. ३ मधील अनुक्रमणिका २ मध्ये नमूद केलेला दंडाच्या प्रकारासाठी हगणदारीमुक्त ODF च्या मार्गदर्शिकानुसार दंड आकारणे **आवश्यक आहे.**

सुधारित दंडाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र. ४

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१.	सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे		रु.२००/-
२.	खाजगी मालमत्तेच्या जागी कचरा टाकणे		रु.२००/
३.	वाहनांतून फेकला जाणारा कचरा		रु.२००/
४.	वाहतुकीच्या वाहनांतुन फेकला जाणारा कचरा		रु.२००/
५.	सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे		रु.१००/-
६.	सार्वजनिक ठिकाणी थुंकणे		रु.२००/-
७.	सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जित करणे		रु.२००/-

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
८.	सार्वजनिक ठिकाणी प्राणी किंवा पक्ष्यांना खाण्यास देणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये	रु.५००/-
९.	सार्वजनिक ठिकाणी वाहने, अन्य कोणत्याही वस्तू दुरुस्त करणे		रु.५००/-
१०.	ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे. (निवासी व वाणिज्य आस्थापना)		रू. २००/- (पहिला प्रसंग) रू. ३००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
११.	मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWGs) यांचेमार्फत ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे.		रू. ३०००/- (पहिला प्रसंग) रू. ९०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी
१२.	मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWGs) यांचेमार्फत ओला व सुका कचरा वर्गिकरण न करणे व सार्वजनिक ठिकाणी टाकणे. (अधिकांश कचरा उत्पादक BWG म्हणजे मालक, दुकानदार, भोगवटादार, गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मालक किंवा भोगवटादाराच्या वतीने प्रतिनिधित्व करणारी कोणतीही व्यकी, उपहारगृह, हॉटेल्स, बाजार, फेरीवाले, दवाखाने, औद्योगिक मालमत्ता आणि व्यापारी संकुले/मॉल्स, शैक्षणिक संस्था यामध्ये कोणतीही सरकारी किंवा सार्व. कार्यालये, इमारत किंवा अन्य		रू. १०००/- (पहिला प्रसंग) रू. ३०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
	वापरकर्ते जसे क्लब, जिमखाने, युवा कार्यालये, शैक्षणिक संकुले, इस्पितळे इत्यादी व्यवसायाचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणे.		
१३.	प्रक्रिया न केलेला जैव वैद्यकीय कचरा साठवणूक करणे.		१० किलो - रू. ५०/- १० ते ५०० किलो - रू. १०/- प्रति किलो
१४.	बांधकाम आणि निष्कासनातून निर्माण होणारा कचरा, दगड, माती, राडा-रोडा, वाळू, विटा सार्वजनिक ठिकाणी टाकणे		एक ब्रास दगड, माती, राडारोडा वाळू, रू. २५००/- प्रमाणे विटा नग १ ते १००० नग रू. २५००/- विटा नग १००० नग ते अधिक रू. २५००/- प्रमाणे.
१५.	सुका कचरा साठवणूक करणे		रु.१००/-
१६.	खाजगी इमारतीमधील मोठी उद्याने आणि बागबगीचा मधील कचरा तसेच खाजगी मोकळया जागेत कचरा टाकणे व साठविणे		रु.३००/-
१७.	रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकाराचा घन कचरा जाळणे		रू.५०००/-
१८.	कोंबडया, मासळी, कत्तलीचा कचरा		पहिल्या १० किलो साठी रू.५००/- व त्या पुढील रू. २० प्रमाणे प्रति किलो.

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१९.	सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी मोकळ्या जागी/दुकानाबाहेर उघड्यावर मांस विक्री केल्यास	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये	रू. ३०००/-
२०.	सर्व विक्रेते/फेरीवाले, त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा		रु.५००/-
२१.	सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर मालकीच्या/पाळीव प्राण्यांपासून होणारा कचरा		रु.२००/-
२२.	रस्त्यावर वाहने उभी केल्यास सदर वाहनाखालची जागा अथवा रस्त्याचा भाग साफ न करणे		रु.२००/-
२३.	महापालिकेची परवानगी न घेता भिंतीवर भिंतीपत्रके अथवा चित्रे लावणे		एक पोस्टर बॅनरसाठी रु.२००/-
२४.	सार्वजनिक रस्ता/फुटपाथ गटारी वर अतिक्रमण करुन अस्वच्छता निर्माण करणे.		रु.१,०००/-
२५.	प्रत्येक पानपट्टीधारकाने स्वतंत्र कचरा पेटी ठेवणे आवश्यक		रू. २००/-
२६.	सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करून रहदारीला अडथळा निर्माण केल्यास आकारावयाच्या दंडाची		रू. १०००/-

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
	रक्कम		
२७.	सेप्टिक टँक मधला मलजल अनधिकृतपणे उघड्यावर टाकणे.	हागणदारी मुक्त (ODF) च्या मार्गदर्शिकानुसार	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रु. १०,०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
२८.	१२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे व हँडल असलेले सर्व प्रकारचे प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिकचे आवरण असलेले सर्व प्रकारचे एकल वापर डिस्पोसेबल वस्तु (ताट, ग्लास, ताटे, चमचे, काटे, वाटी इ.), अन्न पदार्थ पॅकेजिंगसाठी वापरले जाणारे वस्तु, नॉनओव्हन पॉलिप्रॉपिलेन बॅग्स, थर्माकॉल (पॅकेजिंग वगळून) इ. वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, साठवणुक करणारे	महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रू. १०,०००/- (दुसरा प्रसंग) रू. २५,०००/- व ३ महिने कारावास (तिसरा प्रसंग)

अ.क्र.	तपशिल	कायदेशीर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
		याबाबतचे सुधारीत नियमान्वये	

सबब, उपरोक्त सर्व बाबींनुसार महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये प्रभावी देखरेख, जनजागृती व घनकचरा अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यमान मनुष्यबळ अपुरे पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक समावेशन धोरणानुसार तृतीयपंथी व्यक्तींना सन्मानजनक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच महिला बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका हद्दीत घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षकि वर्षाकरिता निविदा प्रक्रिया करुन Clean-Up Marshal याकामी तृतीयपंथी व महिला बचत गटातील सदस्य यांचा समावेश करणेस प्रस्तावाची आवश्यक्ता, उद्दिष्टे, प्रस्तावाची कार्यपद्धती, अपेक्षितपरिणाम, निवड प्रक्रिया,कामाचे स्वरुप व मनपास होणारे फायदे खालीलप्रमाणे आहेत.

प्रस्तावाची आवश्यकता

१. महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

२. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, थुंकणे व प्लास्टिक बंदी नियमांचे उल्लंघन कमी करणे.

३. स्वच्छ भारत अभियान व शासनाच्या घनकचरा अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी स्वच्छता धोरणांना अधिक बळकटी देणे.

४. तृतीयपंथी समाजाला मुख्य प्रवाहात आणून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

५. महिला बचत गटांना नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे.

६. नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती वाढविणे.

प्रस्तावाची उद्दिष्टे-

मुख्य उद्दिष्टे

१. शहरात स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे.
२. तृतीयपंथी व्यक्ती व महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
३. सामाजिक समावेशनाला चालना देणे.
४. स्वच्छता विषयक दंडात्मक व जनजागृती मोहिमा अधिक प्रभावी करणे.

विशेष उद्दिष्टे

१. प्रत्येक प्रभागात अतिरिक्त **Clean-Up Marshal** उपलब्ध करणे.
२. स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करणे.
३. नागरिकांमध्ये स्वच्छता संस्कृती विकसित करणे.

४. महिला बचत गटांच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर सहभाग वाढविणे.

५. तृतीयपंथी व्यक्तींना सन्मानपूर्वक रोजगार व सामाजिक स्वीकार मिळवून देणे.

प्रस्तावाची कार्यपद्धती

१. नियुक्तीमध्ये तृतीयपंथी व्यक्ती व नोंदणीकृत महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येईल.

२. आवश्यक प्रशिक्षण, गणवेश, ओळखपत्र व कामकाजासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्यात येतील.

३. संबंधित विभागामार्फत कार्यक्षेत्र, जबाबदाऱ्या व अहवाल प्रणाली निश्चित करण्यात येतील.

४. प्रभागनिहाय आवश्यकतेनुसार मनुष्यबळाचे नियोजन करण्यात येतील.

प्रस्तावाचे अपेक्षित परिणाम

१. सार्वजनिक स्वच्छतेमध्ये लक्षणीय सुधारणा.

२. स्वच्छता नियमांचे उल्लंघन कमी होईल .

३. महानगरपालिकेच्या महसुलात दंडाद्वारे वाढ होईल.

४. तृतीयपंथी व्यक्तींचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण होण्यास मदत होईल.

५. महिला बचत गटांना स्थिर रोजगार उपलब्ध होईल.

६. नागरिकांचा स्वच्छता मोहिमेत अधिक सहभाग वाढेल .

७. शहराच्या स्वच्छता क्रमवारीत सुधारणा होण्यास मदत होईल.

प्रस्तावाची निवड प्रक्रिया

१. **मनपामार्फत निविदे संदर्भात सार्वजनिक जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.**

२. **शासनाच्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार स्पर्धात्मक प्रक्रिया.**

➢ **तृतीयपंथी संस्थाची पात्रता.**

- **तृतीयपंथी कल्याणासाठी नोंदणीकृत संस्था**
- **तृतीयपंथी शासनमान्य कागदपत्रे व रहिवासी पुरावा तपासणेत येईल.**
- **किमान ३ वर्षांचा कार्यानुभव.**
- **शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.**
- **PAN, GST (लागू असल्यास), EPF, ESIC नोंदणी.**
- **आवश्यक संख्येने प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देण्याची क्षमता.**
- **तृतीयपंथी सदस्यांची नावे व ओळखपत्रांची यादी सादर करणे.**
- **आर्थिक व तांत्रिक पात्रतेचे निकष पूर्ण करणे.**

➢ तृतीयपंथी संस्थाची प्रत्येक वॉर्डमधील मनुष्यबळ.

- प्रत्येक वॉर्डमध्ये २ ते ४ Clean-Up Marshal (लोकसंख्या व व्यापारी क्षेत्रानुसार).
- प्रत्येक ४ वॉर्डांमागे १ तृतीयपंथी सुपरवायझर.
- उच्च गर्दीच्या भागांमध्ये (रेल्वे स्थानक, बाजारपेठ, बसस्थानके) अतिरिक्त मार्शल नेमावेत.
- वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार विशेष मोहिमा.

➢ महिला बचत गटांची पात्रता.

- महाराष्ट्र राज्य ग्रामीण/शहरी जीवनोन्नती अभियान (MSRLM/UMED किंवा DAY-NULM) अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गट किंवा त्यांच्या फेडरेशनला प्राधान्य.
- किमान १ वर्ष कार्यरत असलेला बचत गट.
- बँक खाते, PAN व आवश्यक नोंदणी कागदपत्रे.
- आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची क्षमता.
- शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
- सदस्यांची यादी, आधार/ओळखपत्र व बँक तपशील सादर करणे.

➢ महिला बचत गटांची प्रत्येक वॉर्डमधील मनुष्यबळ.

- प्रत्येक वॉर्डमध्ये २ ते ४ महिला Clean-Up Marshal.
- प्रत्येक ४ वॉर्डांमागे १ महिला सुपरवायझर.
- गर्दीच्या ठिकाणी (बाजारपेठ, बसस्थानक, रेल्वे स्थानक, उद्याने) अतिरिक्त महिला मार्शल नेमणे.
- वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार विशेष मोहिमा.

३. स्थानिक रहिवाशांना प्राधान्य देणेत येईल.

४. संवाद कौशल्य, जनसंपर्क क्षमता व कामाची तयारी यांचे मूल्यमापन करण्यात येईल.

५. संबंधित विभागामार्फत कार्यक्षेत्र, जबाबदाऱ्या व अहवाल प्रणाली निश्चित करण्यात येतील .

६. एकापेक्षा अधिक पात्र महिला बचत गट व तृतीयपंथी संस्था असल्यास कामाचे समान व पारदर्शक वाटप करण्यात येईल.

<u>महिला बचत गट व तृतीयपंथी संस्था प्रभाग समिती निहाय कामाचे वाटप :</u>

प्रभाग समिती	निवडणूक वॉर्ड	काम देण्यात येणारी संस्था
A	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
B	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
C	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था

D	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
E	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
F	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
G	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
H	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था
I	संबंधित वॉर्ड	महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था

उपरोक्तनुसार वॉर्डांमध्ये प्रभागनिहाय कामाचे वाटप केल्यास स्थानिक महिला बचत गटांना व तृतीयपंथी संस्था यांना रोजगाराची संधी मिळेल, कामावर प्रभावी नियंत्रण राहील आणि स्वच्छता उपद्रव नियंत्रणाची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होईल.

प्रस्तावाच्या करारातील अटी

१. पात्र महिला बचत गट व तृतीयपंथी संस्था यांनी आवश्यक प्रशिक्षण घेणे बंधनकारक.

२. पात्र महिला बचत गट व तृतीयपंथी संस्था यांनी गणवेश, ओळखपत्र व सुरक्षा साहित्य वापरणे अनिवार्य.

३. अनुपस्थिती किंवा निकृष्ट कामगिरीबाबत दंडाची तरतूद.

४. महानगरपालिकेला आवश्यकतेनुसार वॉर्डांचे पुनर्वाटप करण्याचा अधिकार राहील.

प्रस्तावाच्या कामाचे स्वरूप

१. स्वच्छतेबाबत जनजागृती करणे.

२. सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करणे.

३. नियमभंगाच्या घटनांची नोंद करणे.

४. संबंधित अधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे.

५. नागरिकांना कचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहित करणे.

प्रस्तावामुळे मनपास होणारे फायदे

१. स्वच्छता नियमांची प्रभावी अंमलबजावणी.

२. शहरात स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती.

३. तृतीयपंथी व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे.

४. सामाजिक समावेशकता व महिला सक्षमीकरणाला चालना.

५. स्थानिक स्तरावर तक्रारी व समस्यांचे त्वरित निराकरण.

६. मनपाची लोकाभिमुख व सर्वसमावेशक प्रतिमा निर्माण होणे.

उपरोक्त नुसार महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये प्रभावी देखरेख, जनजागृती व घनकचरा अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी Clean-Up Marshal व्यवस्थेसाठी नविन निविदा प्रक्रिया करुन तृतीयपंथी व्यक्ती व महिला बचत गटातील पात्र सदस्यांना अंतर्भूत करणेसाठी प्राधान्याने संधी दिल्यास शहरात स्वछता,दंडात्मक कारवाहीमुळे नागरिकांना शिस्त तसेच तृतीयपंथी व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन समाजामध्ये व इतर ठिकाणी मनपाची लोकाभिमुख व सर्वसमावेशक प्रतिमा निर्माण होईल असे विभागास वाटते.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ व केंद्र आणि राज्य शासन यांच्या विविध नियमांन्वये स्वच्छता उपद्रव नियंत्रण यासाठी आकारण्यात येणाऱ्या दंडाची सुधारीत रक्कम **तक्ता क्र. ४ नुसार** निश्चित करुन स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षकि वर्षाकरिता निविदा प्रक्रिया करुन Clean-Up Marshal यांची नियुक्त करणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणे व याकामी तृतीयपंथी व महिला बचत गटातील सदस्य यांचा समावेश करणेस मा. सर्व साधारण सभेची मान्यता मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभे पुढे ठेवण्यास शिफारस आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ व केंद्र आणि राज्य शासन यांच्या विविध नियमांन्वये स्वच्छता उपद्रव नियंत्रण यासाठी आकारण्यात येणाऱ्या दंडाची सुधारीत रक्कम तक्ता क्र. ४ नुसार निश्चित करुन स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) करून नोंदणीकृत महिला बचतगटांमार्फत महिला व आवश्यकतेनुसार पुरूष मार्शल तसेच नोंदणीकृत तृतीयपंथी बचतगटामार्फत / तृतीय पंथी संस्थेमार्फत Clean-Up Marshal म्हणून नियुक्ती करणेकामी, प्रशासकीय मंजुरी मिळणेस मा. सर्व साधारण सभेची मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - (प्रफुल्ल साने)

अनुमोदक - (मनोज पाटील)

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे (Bulk Waste Generators - BWGs) यांचेकरीता ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिद्ध करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मसुदा :- घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ मधील तरतुदींनुसार दररोज १०० कि.ग्रॅ. अथवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात घनकचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी (Bulk Waste Generators - BWGs) त्यांच्या स्तरावर निर्माण होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याचे स्त्रोतस्तरावर वर्गीकरण करून त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करणे, पुनर्वापर करणे व उर्वरित कचऱ्याची पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदर नियमांमध्ये गृहनिर्माण संस्था, व्यावसायिक आस्थापना, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, विवाह सभागृहे, बाजारपेठा, शॉपिंग कॉम्प्लेक्स, शासकीय कार्यालये इत्यादी आस्थापनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर नियमांची अंमलबजावणी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घाऊक कचरा निर्माते (दररोज १०० कि.ग्रॅ. अथवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात) घनकचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी करणे आवश्यक आहे.

यामुळे होणारे सकारात्मक परिणाम :-

१. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीस चालना मिळेल.
२. विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रणालींना प्रोत्साहन मिळेल.
३. कचऱ्याचे पुनर्वापर व संसाधन पुर्नप्राप्ती वाढविण्यासाठी मदत होईल.
४. डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याचा भार कमी करण्याच्या उद्देश सफल होण्यास मदत होईल.

Bulk Waste Generators यांचेकरिता महानगरपालिकेमार्फत पात्र, अनुभवी व तांत्रिकदृष्ट्या सक्षम कचरा प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करणे आवश्यक आहे.

सदर संस्थांमार्फत करावयाची कामे :-

१. मनपा क्षेत्रातील BWGs चे ओल्या कचऱ्यावरील प्रक्रिया सेवा उपलब्ध करून देणे.
२. सुक्या कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण करून पुर्नप्रक्रिया करिता पाठविणे.
३. पुनर्वापर तसेच एकात्मिक कचरा व्यवस्थापन सेवा पुरविणे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांच्या निकषानुसार काम करणाऱ्या सेवा पुरवठादारांचे पॅनलवर नियुक्ती करण्याचा उद्धिष्ठ आहे. जेणेकरून महानगरपालिकेस सदर संस्थेवर व त्यांच्यामार्फत होत असलेल्या कचरा व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवण्यास तसेच त्याबाबत मासिक अहवालाची पडताळणी करण्यास सुलभ होईल. सदर सुचीमध्ये समावेश असलेल्या सेवा पुरवठादारांचे कोणतेही आर्थीक दायित्व महानगरपालिकेवर राहणार नसून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील BWGs यांना सुचीबद्ध सेवा पुरवठादारांपैकी त्यांच्या आवश्यकतेनुसार कोणत्याही सेवा पुरवठादारांची निवड करण्याचे स्वातंत्र्य राहील. तसेच महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार सुचीबद्ध सेवा पुरवठादारांच्या कामकाजांचे तपासणी अथवा पुर्नमुल्यांकन करण्याचा अधिकार राहील. तथापी, BWGs यांना महानगरपालिकेच्या पॅनल बाहेरील अन्य कचरा प्रक्रिया करणारे सेवा पुरवठादाराची नियुक्ती करावयाची असल्यास, संबंधित सेवा पुरवठादार यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) अधिकृत कंपोस्टींग युनिट, सेंद्रिय कचरा रूपांतरक (OWC), बायो-मिथेनेशन प्लांट, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF), किंवा ओल्या किंवा सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी वापरली जाणारी तत्सम सुविधा, BWG च्या आवारात (व्याप्ती - १) किंवा सेवा पूरवठा दाराच्या स्वतःच्या जागेवर (व्याप्ती - २)

याप्रमाणे BWG संस्थेच्या गरजेनुसार कामाची व्याप्ती दोन प्रकारात खालीलप्रमाणे विभागता येईल व त्याप्रमाणे सेवा पुरवठादारांची निवड करण्यात येईल.

- ❖ कामाची व्याप्ती – १/ जागेवर कचरा प्रक्रिया करणे :- ज्या BWG च्या आवारात पुरेशी जागा उपलब्ध आहे तेथे सुचीबद्ध पुरवठादाराद्वारे कचरा प्रक्रिया संयंत्र/ प्रणालीची स्थापना कार्यान्वीत, संचालन व देखभाल करणे. सुचीबद्ध पुरवठादार यांना खालील बाबींनुसार काम करणे बंधनकारक राहील.

१. BWG च्या कचरा निर्मितीच्या प्रमाणानुसार, BWG च्या जागेवर योग्य ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या संयंत्राची/प्रणालीची (उदा., सेंद्रिय कचरा कन्व्हर्टर, इन-व्हेसल कंपोस्टिंग युनिट, बायो-मिथेनेशन प्लांट) रचना करणे, पुरवठा करणे, स्थापित करणे आणि कार्यान्वित करणे.

२. स्थापित संयंत्र कार्यान्वित करण्यापूर्वी MPCB ची संमती/अधिकृतता व आवश्यकतेनुसार त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक.

३. प्रतिबंधात्मक आणि बिघाड दुरुस्तीच्या देखभालीसह, जागेवरील संयंत्राचे दैनंदिन संचालन आणि देखभाल करणे.

४. जागेवर निर्माण होणाऱ्या 100% ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे कंपोस्ट, खत, बायोगॅस किंवा इतर मान्यताप्राप्त अंतिम उत्पादनांमध्ये रूपांतर करणे.

५. सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे, साठवणूक करणे व अधिकृत पुनर्वापरकर्ते / एमआरएफ येथे वेळेवर पाठवण्याची व्यवस्था करणे, ज्यामध्ये परिपुर्ण (कचरा संकलन केल्यापासून ते विल्हेवाट/प्रक्रिया लावेपर्यंत) नोंदी ठेवण्याचा समावेश राहील.

६. जागेवरील संयंत्राच्या दैनंदिन संचालन आणि देखभालीसाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ (ऑपरेटर/पर्यवेक्षक) नियुक्त करणे.

७. प्लांट आणि मशिनरीचा वार्षिक देखभाल करार (AMC) जबाबदारी, ज्यामध्ये वापरलेल्या वस्तूंच्या बदली बाबत खर्चाचा समावेश राहील.

८. प्रचलित नियमांनुसार टाकाऊ/उर्वरित (Reject/ Inert) कचऱ्याची सुरक्षित हाताळणी, साठवणूक आणि विल्हेवाट लावणे.

९. प्रचलित नियमांनुसार सेनिटरी कचरा व घरगुती घातक/ विशेष दक्षता घेणे योग्य कचऱ्याची सुरक्षित हाताळणी, साठवणूक व अधिकृत प्रणालीद्वारे विल्हेवाट लावणे.

१०. प्रत्येक संकलन फेरीसाठी ट्रिप शीट, डिजिटल ट्रॅकिंग लॉग आणि वेब्रिज नोंदी जतन करणे व मागणीनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेला उपलब्ध करून देणे.

११. गोळा केलेला कोणताही कचरा अनधिकृत विल्हेवाट, उघड्यावर टाकणे किंवा भूगर्भात भरणे यासाठी वळवला जाणार नाही याची दक्षता घेणे. अन्यथा सदर संस्थेवर कार्यवाही करून पॅनलवरून कमी करण्यात येईल.

१२. दैनिक/साप्ताहिक कार्यान्वयन नोंदी आणि मासिक उपयोगिता अहवाल वसई विरार शहर महानगरपालिका व संबंधित BWG यांना सादर करणे.

१३. साइटवर नियुक्त केलेल्या मनुष्यबळासाठी सर्व लागू कामगार कायद्यांचे पालन करणे.

१४. सदर पुरवठादाराने स्वत:च्या खर्चाने आणि त्यानंतर मंजूर दराच्या आधारावर काम करावयाचे आहे. मंजूर दर/ जागेवरील प्रक्रिया शुल्क यामध्ये संयंत्राची स्थापना, त्याचे संचालन व देखभाल (O&M), मनुष्यबळ, उपभोग्य वस्तू आणि जागेवरील प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले इतर सर्व घटक यांचा समावेश राहील व याची संपूर्ण जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची असेल. सदर कामासाठी कोणताही वेगळा खर्च BWG मार्फत आकारता येणार नाही. जागेवर प्रक्रिया केलेल्या कचऱ्याच्या प्रति मेट्रिक टन (MT) साठी एकच सर्वसमावेशक दर नमुद करणे आवश्यक आहे ज्यामध्ये वरील सर्व बाबींचा समावेश राहील.

❖ कामाची व्याप्ती – 2/ बाह्य कचरा प्रक्रिया :- सेवा पुरवठादाराच्या स्वतःच्या अधिकृत जागेवर/ प्रक्रिया केंद्र येथे कचरा संकलन, वाहतूक व प्रक्रिया करणे. सुचीबद्ध पुरवठादार यांना खालील बाबींनुसार काम करणे बंधनकारक राहील.

१. घाऊक कचरा निर्माते (Bulk Waste Generators) संस्था ज्यांच्या आवारात प्रक्रिया सुविधा (on-site processing facility) स्थापित करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. अशा BWGs चा वर्गिकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन, वाहतुक व प्रक्रिया सूचीबद्ध सेवा पुरवठादारामार्फत (empanelled agency) त्यांच्या अधिकृत प्रक्रिया केंद्र येथे करणे.

२. ठरलेल्या वारंवारतेनुसार (आवश्यकतेनुसार दररोज/एक दिवसाआड) BWG च्या आवारातून वेगळा केलेला ओला आणि/ किंवा सुका कचरा गोळा करणे.

३. मार्गावर कचरा सांडणे व अस्वच्छता टाळण्यासाठी, जीपीएस ट्रॅकिंग बसवलेल्या, झाकलेल्या, गळती-रोधक आणि नियमानुसार असलेल्या वाहनांचा वापर करून कचऱ्याची वाहतूक करणे.

४. कचरा संकलनाच्या ठिकाणी, रिकामी /प्रक्रियेच्या ठिकाणी त्याचे वजन करणे व BWG ला वजन पावती सादर करणे.

५. गोळा केलेला कचरा केवळ सेवा पुरवठादाराच्या MPCB अधिकृत प्रक्रिया केंद्र येथे (कंपोस्ट प्लांट/बायो-मिथेनेशन प्लांट/एमआरएफ, लागू असेल त्याप्रमाणे) वाहतुक करणे, जी BWG च्या आवाराबाहेर स्थित असेल.

६. वाहतूक केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कंपोस्ट, बायोगॅस, आरडीएफ, पुनर्प्राप्त पुनर्वापरयोग्य वस्तू किंवा इतर मंजूर अंतिम उत्पादने तयार करणे व उत्पादनाची नोंद ठेवणे.

७. प्रत्येक संकलन फेरीसाठी ट्रिप शीट, डिजिटल ट्रॅकिंग लॉग आणि वेब्रिज नोंदी जतन करणे व मागणीनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेला उपलब्ध करून देणे.

८. गोळा केलेला कोणताही कचरा अनधिकृत विल्हेवाट, उघड्यावर टाकणे किंवा भूगर्भात भरणे यासाठी वळवला जाणार नाही याची दक्षता घेणे. अन्यथा सदर संस्थेवर कार्यवाही करून पॅनलवरून कमी करण्यात येईल.

९. मासिक संकलन, वाहतूक व प्रक्रियासह अहवाल BWG व मनपास सादर करणे.

१०. नियुक्त केलेल्या वाहनांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी सर्व लागू कामगार कायदे आणि मोटार वाहन नियमांचे पालन करणे.

११. सदर पुरवठादाराने स्वतःच्या खर्चाने आणि त्यानंतर मंजूर दराच्या आधारावर काम करावयाचे आहे. मंजूर दर/ जागेवरील प्रक्रिया शुल्क यामध्ये कचरा संकलन, वाहतुक व प्रक्रिया तसेच सर्व मनुष्यबळ, वाहने व उपभोग्य वस्तुंचा समावेश राहील व याची संपूर्ण जबाबदारी संबंधित सेवा पुरवठादाराची असेल. सदर कामासाठी कोणताही वेगळा खर्च BWG मार्फत आकारता येणार नाही. जागेवर प्रक्रिया केलेल्या कचऱ्याच्या प्रति मेट्रिक टन (MT) साठी एकच सर्वसमावेशक दर नमुद करणे आवश्यक आहे ज्यामध्ये वरील सर्व बाबींचा समावेश राहील.

❖ सदर सेवा पुरवठादारांची पात्रता ठरविणेकामी खालील बाबींचा समावेश राहील.

१. नोंदणी प्रमाणपत्र
२. पॅन कार्ड
३. GST नोदणी प्रमाणपत्र
४. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र
५. PF/ ESIC नोंदणी प्रमाणपत्र
६. अनुभव प्रमाणपत्र (घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये किमान ३ वर्षे)
७. केलेल्या कामाचा कार्यादेश (३ वर्षे)
८. काम पुर्ण केलेल्या कामाचे प्रमाणपत्र
९. वित्तीय विवरण प्रमाणपत्र (मागील ३ वर्षे)

१०. सरासरी मागील ३ वर्षाचे वित्तीय उलाढाल (किमान रूपये ५ लक्ष)

११. सॉलवेन्सी प्रमाणपत्र

१२. काळ्यायादीत नाव समाविष्ठ नसावे.

१३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे अधिकृत प्रमाणपत्र.

१४. प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्धता

१५. आवश्यक वाहने/ संयंत्रणे पुरविणेस सक्षम.

ज्या BWG गृहनिर्माण संस्था आहेत अशा संस्थांना मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दि.२०/०४/२०१८ अन्वये ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे व कचरा निर्मीतीचे ठिकाणीच ओल्या कचऱ्यापासून खत निर्मीती करणेकामी मालमत्ता करामध्ये ५% सवलत देण्यात येईल.

तसेच नगरविकास विभाग, राज्य शासन यांची दि. ०१ जूलै २०१९ रोजीची अधिसुचना व जावक क्र.घ.क./२०९२/२०२५-२६ दि.१६/०२/२०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेने पारित केलेला आदेश अन्वये घनकचरा "व्यवस्थापन व हाताळणी", स्वच्छता व आरोग्य उपविधीच्या अनुषंगाने शहरातील रहिवासी व वाणिज्य आस्थापना मधून घनकचरा संकलन करण्यासाठी दर/ उपयोगकर्ता शुल्क (User Charges) सन २०२६-२७ करिता खालीलप्रमाणे लागु करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	वर्गवारी	सन २०२६-२७ करिता प्रस्तावित दरमहा दर/उपयोगकर्ता
१.	प्रति घर	रू. ६३.८२
२.	दुकाने, दवाखाने इत्यादी	रू. ७६.५८
३.	शोरुम (उपकरणे, फर्निचर, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स इ.)	रू. १५३.१६
४.	गोदामे	रू. १५३.१६
५.	उपहारगृहे व हॉटेल	रू. १५३.१६
६.	राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल	रू. २०४.२०
७.	पन्नास खाटांपेक्षा कमी	रू. ५३.१६
८.	पन्नास खाटांपेक्षा जास्त	रू. २२९.७३
९.	शैक्षणिक संस्था, वसतिगृहे	रू. ११४.८७
१०.	धार्मिक संस्था	रू. ११४.८७
११.	शासकिय/ निम्नशासकिय कार्यालये	रू. ११४.८७
१२.	विवाह कार्यालये/मनोरंजन सभागृहे/ एक पडदा चित्रपटगृहे	रू. १२७६.२९
१३.	खरेदी केंद्रे / बहूपडदा चित्रपटगृहे	रू. १९१४.४२
१४.	फेरीवाले	रू. १९१.४४
१५.	हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा/संत्संग/खाद्य महोत्सव / फटाक्याचे दुकान	स्थानिक स्वराज्य संस्थानी मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारीत करावे.

त्याअनुषंगाने ज्या BWG मार्फत दैनंदिन निर्माण होणाऱ्या घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येईल अश्या BWGs च्या मालमत्ता करामधून आकारण्यात येणाऱ्या उपयोगकर्ता शुल्कामध्ये (User Charges) सुट देणे उचित राहील. सदर BWGs चा 'Inert कचरा (ज्यावर प्रक्रिया करणे शक्य नाही)' महानगरपालिका मार्फत उचलण्यात येईल.

तसेच सदर संस्थेच्या संकुला बाहेरील परिसरातील साफसफाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे उपयोगकर्ता शुल्कामध्ये १००% सुट देणे शक्य नाही. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) च्या माध्यमातून घनकचरा प्रक्रियाचे विविध तंत्रज्ञान सोबत दर देखील मागविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना उपयोगकर्ता शुल्कामध्ये किती दराने सुट देणे योग्य राहील याबाबत निर्णय घेण्यास मदत होईल.

तरी, उपरोक्तप्रमाणे तयार करण्यात आलेल्या "घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी (BWGs) ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करण्यासाठी" या स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविणेकामी सदर EOI महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

तरी, "घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी (BWGs) ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करण्यासाठी" या स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिद्ध करणेस प्रशासकिय मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेपुढे प्राथमिक मंजूरी मिळणेस पुढील ठराव करणेत येत आहे.

ठराव / निर्णय :- १. "घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दररोज १०० कि.ग्रॅम अथवा त्यापेक्षा जास्त प्रमाणात ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करण्यासाठी" या स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिद्धी देणेस मा. सर्व साधारण सभा प्रशासकिय मान्यता देत आहे.

२. सेवा पुरवठादाराच्या कामाचे स्वरूप, आवश्यक घटक व गुणवत्तेनुसार कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांना/ BWGs यांना उपयोगकर्ता शुल्कामध्ये सुट देणेकरिता दर ठरविणेसाठी मान्यता देण्यात येईल

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमतानि~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६-**

विषय :- उसगाव/शिरवली योजनेवरील कमकुवत झालेली ७०० मी.मी. व्यासाची ८ कि.मी. लांबीची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २२,६७,४५,६२१/-

उसगाव/ शिरवली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेस २० द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. सदरची योजना सन १९९६ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वीत करण्यांत आली आहे.

उसगाव ते पारोळ दरम्यान अशुध्द पाण्याची गुरूत्व वाहिनी १०.३० कि.मी. ही P.S.C. प्रकारची असून भुपृष्ठापासून काही ठिकाणी १०-१५ फुट खोल आहे. सद्य:स्थितीत सदर जलवाहिनी जिर्ण झाल्याने ती लवकरच बदलणे आवश्यक आहे. तसेच शुध्द पाण्याची उर्ध्व वाहिनी ७.५० कि.मी. (पारोळ ते चंदनसार दरम्यान) हि P.S.C. प्रकारची असून भुपृष्ठापासून काही ठिकाणी १०-१५ फुट खोल आहे. सद्य:स्थितीत सदर जलवाहिनी जिर्ण झाल्याने ती लवकरच बदलणे आवश्यक आहे.

काही भागातील जलवाहिनी खालील R.C.C. पेडिस्टल (pedestals/upon on chair) मध्ये ही नुकसान झाले असून ते दुरूस्त करणे आवश्यक आहे

सदर योजनेअंतर्गत अंथरण्यात आलेल्या जलवाहिन्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	ठिकाण	अशुध्द पाण्याची गुरूत्व वाहनी	शुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी	प्रकार	लांबी (कि.मी.)
१	उसगांव उदचंन केंद्र ते पारोळ जलशुध्दीकरण केंद्र	७०० मी.मी. व्यासाची	--	P.S.C.	१०.२
२	पारोळ जलशुध्दीकरण केंद्र ते चंदनसार M.B.R.	--	७०० मी.मी. व्यासाची	P.S.C./M.S.	१३.१
	एकूण				२३.३

वरील योजनेतील जलवाहिन्यांना वारंवार गळती लागत असल्याने सदर जलवाहिन्यांचे Structural and Hydraulic Audit करण्यासाठी दि.१२/१२/२०१७ अन्वये भारतीय प्राद्योगिक संस्थाने, मुंबई (IIT Mumbai) यांना याकामी नियुक्त करण्यात आले असून त्यांनी दि.०५/०१/२०२१ रोजी अहवाल महापालिकेस सादर केला आहे.

IIT Mumbai ने सादर केलेल्या अहवालानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय देऊन कामे हाती घेणे बाबत सुचित केले आहे.

१. उसगाव जलपुरवठा योजनेची मुख्य जलवाहिनी (Main Pipeline) अत्यंत जुनी झालेली असून तिची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. त्यामुळे ही जलवाहिनी नवीन जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे. तसेच, गंजलेल्या/जीर्ण झालेल्या एम.एस. (MS) जलवाहिनीच्या भागांचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करून टप्प्याटप्प्याने पुनर्स्थापन करणे आवश्यक आहे.
२. सूर्या जलपुरवठा योजनेच्या (टप्पा १ व २) मुख्य जलवाहिनीची नियमित दुरुस्ती व देखभाल करण्यात यावी.
३. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध जलपुरवठा योजनांची नियमित दुरुस्ती, देखभाल तसेच नियतकालिक तांत्रिक लेखापरीक्षण (Audit) करणे अत्यंत आवश्यक व शिफारसीय आहे.
४. दिवेकर पाडा ते बहाडोली पुलादरम्यानची १५०० मिमी व्यासाची व २.७० कि.मी. लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.
५. काशीद कोपर ते तानसा नदीदरम्यानची १२०० मिमी व्यासाची व ३५० मीटर लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.
६. ढेकाळे विभागातील १५०० मिमी व्यासाची व ३५० मीटर लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.

७. Western Express Highway (WEH) जलवाहिनीच्या लगत असलेला व मातीखाली गाडलेला पी.एस.सी. (PSC) जलवाहिनीचा भाग योग्य नियोजन व व्यवस्थापन करून टप्प्याटप्प्याने एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे उसगांव जलवाहिनीवरील जवळपास १७.८ कि.मी. लांबीची जलवाहिनी बदलून त्याऐवजी नविन M.S. प्रकारची जलवाहिनी अंथरणेबाबत IIT Mumbai यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सदर जलवाहिनी बदलणे आवश्यक होते. सदर कामी येणाऱ्या खर्चाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता टप्प्याने टप्प्याने सदर जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेण्यात आले.

प्रथम टप्प्यात ५.२१० कि.मी. लांबीची जलवाहिनी बदलून MS प्रकारची जलवाहिनी अंथरणे कामी निविदा मागविण्यात आल्या व सदरचा खर्च केंद्र शासनाच्या १५ वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीतून भागविण्यात आला आहे. खालील प्रमाणे P.S.C. प्रकारच्या जलवाहिन्या बदलून M.S. जलवाहिन्या अंथरणेचे काम दि.३१/०७/२०२४ रोजी पुर्ण करण्यात आले आहे.

अ.क्र.	ठिकाण	व्यास	अंतर (मीटर)
१	उसगाव उदचंन केंद्र ते मेढा फाटा यादरम्यानची	७०० मी.मी.	३०००
२	शिरसट फाटा ते कणेर दरम्यान		१५०
३	कणेर ते पिरकुंडा दरम्यान		१०६०
४	बरफपाडा ते गडगापाडा विरार पुर्व दरम्यान		१०००

IIT Mumbai ने सादर केलेल्या अहवालानुसार एकूण १७.८ कि.मी. लांबीच्या जलवाहिनीपैकी उर्वरीत सद्य:स्थितीत १२.५९ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी नविन M.S. प्रकारची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

दुसऱ्या टप्प्यात ८ कि.मी. लांबीकरीता खालील प्रमाणे P.S.C. प्रकारच्या जलवाहिन्या बदलून M.S. जतलवाहिन्या अंथरणे विभागामार्फत प्रस्तावीत करण्यात येत आहे. उर्वरीत ४.५९ कि.मी. जलवाहिनी तिसऱ्या टप्प्यात प्रस्तावित करण्यात येईल.

अ.क्र.	ठिकाण	व्यास	अंतर (मीटर)
१	उसगांव धरण नाका ते पारोळ जलशुध्दीकरण केंद्र	७०० मी.मी.	८०००

वरील P.S.C. प्रकारच्या जलवाहिन्या ह्या जास्त जीर्ण झालेल्या असून सदर भागात वारंवार गळती होत आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्यात सदर भागातील जलवाहिनी बदलून त्याऐवजी MS जलवाहिनी अंथरणे प्रस्तावित करण्यात येत असून या कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारीत रू.२१.८५ कोटी चे अंदाजपत्रक तयार करून "अधिसुचीत विशिष्ट नागरी सेवा व सुविधा योजने" अंतर्गत प्रस्तावित करण्यास व निधी उपलब्ध होण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र.१२९६ दि.०९/११/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या शिफारशीसह नियोजन विभाग, मंत्रालय येथे सादर करण्यात आला. मात्र सदर प्रस्तावास निधी अभावी मान्यता देण्यात आलेली नाही. तथापी सदर कामाची निकड पाहता महानगरपालिका निधीतून सदर काम प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

या कामी रू.२२,६७,४५,६२१/- चे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२३-२४ च्या दरसूचीवर आधारीत तयार करण्यात आले असून दि.२२/०५/२०२६ रोजीच्या अंदाजपत्रकीय पडताळणी व तांत्रिक मान्यता समितीने सदर अंदाजपत्रकास मान्यतेकरीता शिफारस केली आहे.

सदर कामाचा खर्च अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा, भांडवली खर्चामधील "विकास निधी अंतर्गत उसगाव भांडवली कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे. सदर लेखाशिर्षावर सन २०२६-२७ या वर्षात रु. ५ कोटी तरतुद शिल्लक असून रु.४ कोटीपर्यंत खर्च या वित्तीय वर्षात अपेक्षीत आहे. उर्वरीत खर्च २०२७-२८ या आर्थिक वर्षात अपेक्षीत असून त्यकरीता आवश्यक ती तरतुद करण्यात येईल.

उपरोक्त कामासाठी बी/१ प्रकारची ई- निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. तरी उसगाव/शिरवली योजनेवरील उसगांव धरण नाका ते पारोळ जलशुध्दीकरण केंद्र दरम्यान कमकुवत झालेली ७०० मी.मी. व्यासाची ८ कि.मी. लांबीची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे कामी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यासह सदर अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार प्रशायकीय मान्यता मिळणेच्या दृष्टीने प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरीची शिफारस आहे.

ठराव / निर्णय :-

१. उसगाव/शिरवली योजनेवरील कमकुवत झालेली ७०० मी.मी. व्यासाची ८ कि.मी. लांबीची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे कामास तसेच या कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रु. २२,६७,४५,६२१/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कामी B/१ प्रकारची निविदा मागविण्याकामी जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यास व अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - अंजना थोपेकर

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- सुर्या टप्पा-१ योजनेतील १५०० मी.मी. व्यासाची दिवेकरपाडा ते बहाडोली ब्रिज पर्यंत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची मुख्य जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २१,३३,१४,१६५/-

सुर्या टप्पा-१ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेस १०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. सदरची योजना सन २००६ पुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वीत करण्यांत आली आहे.

सदर योजनेची मुख्य जलवाहिनी सुमारे २० वर्षापुर्वी अंथरल्या आहेत. महानगरपालिकेच्या उसगांव व सुर्या (जुनी) पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिन्यांबाबत आय.आय.टी.,मुंबई या संस्थेने दि.०५/०१/२०२१ च्या अहवालात पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत.

१. उसगाव जलपुरवठा योजनेची मुख्य जलवाहिनी (Main Pipeline) अत्यंत जुनी झालेली असून तिची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. त्यामुळे ही जलवाहिनी नवीन जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे. तसेच, गंजलेल्या/जीर्ण झालेल्या एम.एस. (MS) जलवाहिनीच्या भागांचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करून टप्प्याटप्प्याने पुनर्स्थापन करणे आवश्यक आहे.
२. सूर्या जलपुरवठा योजनेच्या (टप्पा १ व २) मुख्य जलवाहिनीची नियमित दुरुस्ती व देखभाल करण्यात यावी.
३. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध जलपुरवठा योजनांची नियमित दुरुस्ती, देखभाल तसेच नियतकालिक तांत्रिक लेखापरीक्षण (Audit) करणे अत्यंत आवश्यक व शिफारसीय आहे.
४. दिवेकर पाडा ते बहाडोली पुलादरम्यानची १५०० मिमी व्यासाची व २.७० कि.मी. लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.
५. काशीद कोपर ते तानसा नदीदरम्यानची १२०० मिमी व्यासाची व ३५० मीटर लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.
६. ढेकाळे विभागातील १५०० मिमी व्यासाची व ३५० मीटर लांबीची पी.एस.सी. (PSC) जलवाहिनी त्याच व्यासाच्या एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.
७. Western Express Highway (WEH) जलवाहिनीच्या लगत असलेला व मातीखाली गाडलेला पी.एस.सी. (PSC) जलवाहिनीचा भाग योग्य नियोजन व व्यवस्थापन करून टप्प्याटप्प्याने एम.एस. (MS) जलवाहिनीने बदलणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे आय.आय.टी.,मुंबई या संस्थेने नोंदविलेल्या अभिप्रायानुसार खालील प्रमाणे जलवाहिन्या बदलण्याची कामे माहे जूलै, २०२५ रोजी पुर्ण करण्यात आली आहेत.

अ.क्र.	ठिकाण	व्यास	लांबी
१	**ढेकाळे सेक्शन**	**१५०० मी.मी.**	**३५० मीटर**
२	**काशिदकोपर व तानसा सेक्शन**	**१२०० मी.मी.**	**३५० मीटर**

IIT Mumbai ने सादर केलेल्या अहवालानुसार एकूण ३.४ कि.मी. लांबीच्या PSC जलवाहिनीपैकी ७०० मीटर करीता काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत २.७ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी नविन M.S. प्रकारची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

दुसऱ्या टप्प्यात २.७० कि.मी. लांबीकरीता खालील प्रमाणे P.S.C. प्रकारच्या जलवाहिन्या बदलून M.S. जलवाहिन्या अंथरणे विभागामार्फत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	ठिकाण	व्यास	अंतर (मीटर)
१	**दिवेकर पाडा ते बहाडोली ब्रिज पर्यंत**	**१५०० मी.मी.**	**२७००**

वरील P.S.C. प्रकारच्या जलवाहिन्या ह्या जास्त जीर्ण झालेल्या असून सदर भागात वारंवार गळती होत आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्यात सदर भागातील जलवाहिनी बदलून त्याऐवजी MS जलवाहिनी अंथरणे प्रस्तावित करण्यात येत असून या कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारीत रू.२१.६२ कोटीचे अंदाजपत्रक तयार करून "अधिसुचीत विशिष्ट नागरी सेवा व सुविधा योजने" अंतर्गत प्रस्तावित करण्यास व निधी उपलब्ध होण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. १२९६ दि.०९/११/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या शिफरशीसह नियोजन

विभाग, मंत्रालय येथे सादर करण्यात आला. मात्र सदर प्रस्तावास निधी अभावी मान्यता देण्यात आलेली नाही. तथापी सदर कामाची निकड पाहता महानगरपालिका निधीतून सदर काम प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२३-२४ च्या दरसूचीवर आधारीत तयार करण्यात आलेल्या रु.२१,३३,१४,१६५/- अंदाजपत्रकास दि.२२/०५/२०२६ रोजीच्या अंदाजपत्रकीय पडताळणी व तांत्रिक मान्यता समितीने मान्यतेकरीता शिफारस केली आहे.

सदर कामाचा खर्च अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा, भांडवली खर्चामधील "विकास निधी अंतर्गत सुर्या भांडवली कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे. सदर लेखाशिर्षावर सन २०२६-२७ या वर्षात रु. ६.९२ कोटी तरतुद शिल्लक असून रु. ५ कोटीपर्यंत खर्च या वित्तीय वर्षात अपेक्षीत आहे. उर्वरीत खर्च २०२७-२८ या आर्थिक वर्षात अपेक्षीत असून त्यकरीता आवश्यक ती तरतुद करण्यात येईल.

उपरोक्त कामासाठी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी सुर्या योजनेतील दिवेकरपाडा ते बहाडोली ब्रिज पर्यंत अंथरलेली कमकुवत झालेली १५०० मी.मी. व्यासाची २.७ कि.मी. लांबीची पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रु.२१,३३,१४,१६५/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ नुसार मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरीता सादर करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरीची शिफारस आहे.

ठराव / निर्णय :-

१. सुर्या टप्पा-१ योजनेतील १५०० मी.मी. व्यासाची दिवेकरपाडा ते बहाडोली ब्रिज पर्यंत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची मुख्य जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणे कामास तसेच या कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रु.२१,३३,१४,१६५/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कामी B/१ प्रकारची निविदा मागविण्याकामी जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यास व अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - रंजना थावेकर

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २० **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- प्रधानमंत्री टी.बी.मुक्त भारत अभियानांतर्गत पोषण आहार किट देणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (क्षयरोग विभाग) मार्फत क्षयरोग रुग्ण तपासणी व औषधोपचार करण्यात येते, निक्षय मित्रां मार्फत क्षयरुग्णांसाठी आवश्यकतेनुसार पोषण आहार उपलब्ध होत होता. परंतू सद्यस्थितीत सदर पोषण आहार कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने वसई विरार शहर महानगरपालिका स्तरावरुन मंजुर वार्षिक अर्थसंकल्पामधून क्षयरुग्णासाठी पोषण आहाराचे वाटप करणे आवश्यक आहे. तरी दरमहा एका क्षयरुग्णाच्या आवश्यक अन्नघटकांसाठी साधारणता ७०० रु. खर्च येऊ शकतो. सदर पोषण आहारातील आवश्यक अन्नघटकांची माहीती खालीलप्रमाणे :

अन्न गट	उच्च प्रोटीन पर्याय	प्रति किलो अंदाजित किंमत (रु.)	प्रमाण
तृण धान्ये व भरड धान्ये	नाचणी	४५-७०	प्रत्येकी २ किलो
	बाजरी	३५-५५	
डाळी व कड धान्ये	मसुर डाळ	९०-१२०	प्रत्येकी १ किलो
	मटकी	११०-१५०	
खाद्य तेल	सुर्यफुल तेल	१५०-१८०	१ लीटर
इतर	शेंगदाणे	१००-१५०	एक किलो
	गुळ	७०-१००	अर्धा किलो

यास्तव वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये औषधोपचार घेणा-या साधारणतः ३००० रुग्णांच्या पोषण आहारासाठी (सन २०२६-२०२७) व पुढील वर्षाकरिता अदांजीत खर्च अपेक्षित आहे.

अनु.क्र	अंदाजित क्षयरोग रुग्ण (सन २०२६-२०२७)	(सन २०२६-२०२७) मध्ये अंदाजीत खर्च	एकुण अंदाजित खर्च
१.	३०००	३०००X ७०० (प्रति व्यक्ती) X ६ महिने	रु. १,२६,००,०००/-

सन २०२७-२०२८,२०२८-२०२९

अनु.क्र	सन	अंदाजीत क्षयरोग रुग्ण	एकुण अंदाजित खर्च
१.	**सन २०२७-२०२८**	४५००X ७०० (प्रति व्यक्ती) X ६ महिने	रु. १,८९,००,०००/-
२.	**सन २०२८-२०२९**	४५००X ७०० (प्रति व्यक्ती) X ६ महिने	रु. १,८९,००,०००/-
एकूण			**रु. ३,७८,००,०००/-**

वरिल चालु वर्षासाठी (सन २०२६-२०२७) अंदाजे रु. १,२६,००,०००/- तसेच पुढील वर्षाकरिता (सन २०२७-२०२८,२०२८-२०२९) रु. ३,७८,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च म.न.पा रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार तथा पोषण व आरोग्य भत्ता (२०% मा.क.यो) या लेखाशिर्षातून भागविता येईल. तरी क्षयरोग रुग्णांना पोषण आहार बचत गटाव्दारे खरेदी व वाटप करणेकामी येणा-या संपुर्ण खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे.

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (क्षयरोग विभाग) मार्फत क्षयरोग रुग्ण तपासणी व औषधोपचार करण्यात येते, निक्षय मित्रां मार्फत क्षयरुग्णांसाठी आवश्यकतेनुसार पोषण आहार उपलब्ध होत होता. परंतू सद्यस्थितीत सदर पोषण आहार कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने वसई विरार शहर महानगरपालिका स्तरावरुन मंजुर वार्षिक अर्थसंकल्पामधून क्षयरुग्णासाठी पोषण आहाराचे खरेदी व वाटप होणेकरिता बचत गटाची चालु वर्ष व पुढील दोन वर्षाकरिता नियुक्ती करणेकामी आजची सभा प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २१ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वैद्यकीय आरोग्य विभागातील शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील मंजूर असलेल्या एकूण ६७५ आशा स्वयंसेविकांना माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ पर्यंतचे महानगरपालिकेच्या निधीतून मानधन अदा करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) चा सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) राज्यस्तरावरुन मंजूर करण्यात आला आहे. सदर आराखडयात मंजूर केल्यानुसार कंत्राटी पध्दतीवर विविध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. मंजूर असलेल्या एकूण ६७५ आशा स्वयंसेविकांना माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ पर्यंतचे महानगरपालिकेच्या निधीतून मानधन अदा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली होती. सदरच्या आशा स्वयंसेविकांना त्यांच्या सेवाजेष्ठतेप्रमाणे त्यांच्या मानधनात वाढ करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली आहे. मंजूर असलेल्या एकूण ६७५ आशा स्वयंसेविकांना माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ पर्यंतचे महानगरपालिका निधीतून मानधन अदा करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास खालील तक्ता अ व ब प्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यकता आहे.

अ. क्र.	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची नावे	मंजूर आशा स्वयंसेविकांची संख्या	कार्यरत आशा स्वयंसेविकांची संख्या	० ते ३ वर्ष पूर्ण झालेल्या आशा स्वयंसेविकांची संख्या	३ ते ६ वर्ष पूर्ण झालेल्या आशा स्वयंसेविकांची संख्या	६ ते ९ वर्ष पूर्ण झालेल्या आशा स्वयंसेविकांची संख्या	९ वर्ष पेक्षा जास्त वर्ष झालेल्या आशा स्वयंसेविकांची संख्या	रिक्त आशा स्वयंसेविकांची संख्या
१	आचोळे	३२	३१	११	९	०४	०७	०१
२	आंबेडकर नगर	२३	२२	११	०३	०५	०३	०१
३	बऱ्हामपूर	२४	२४	१५	०४	०३	०२	००
४	बिलालपाडा	६१	५१	३३	०७	११	००	१०
५	बोळींज	२१	१२	०६	०२	०४	००	०९
६	चंदनसार	३४	२३	१३	०५	०४	०१	११
७	धानिव	४६	४४	२४	१०	००	१०	०२
८	दिवाणमान	२९	२५	१६	०२	०४	०३	०४
९	जुचंद्र	२५	२४	१४	०३	०५	०२	०१
१०	मोरेगाव	२४	२०	१५	०२	००	०३	०४
११	नारिंगी	३३	३३	२१	०६	०५	०१	००
१२	नवघर	२२	२१	१३	०२	०४	०२	०१
१३	निदान	२९	२३	१०	०५	०५	०३	०६

१४	पाटणकर पार्क	४३	३१	०९	११	०२	०९	१२
१५	पेल्हार	३८	३२	२३	०५	०१	०३	०६
१६	रानळेतलाव	४६	३२	२१	०८	००	०३	१४
१७	सर्वोदय वसाहत	३०	२६	१५	०४	०५	०२	०४
१८	सातिवली	३५	३०	२०	०५	०१	०४	०५
१९	वसई	२१	२०	१३	०४	०२	०१	०१
२०	वालिव	३३	३२	२१	०४	०४	०३	१
२१	झालावाड	२६	२४	१९	०४	००	०१	०२
एकूण		**६७५**	**५८०**	**३४३**	**१०५**	**६९**	**६३**	**९५**

सदर आशांना शासनामार्फत कामावर आधारित मोबदला अदा करण्यात येतो. तसेच त्यांना सेवाजेष्ठतेप्रमाणे खालील तक्ता ब मध्ये नमुद केलेनुसार मानधन महानगरपालिके मार्फत अदा केले जाते. राज्यस्तरावरुन मंजूर करण्यात आलेल्या एकूण ६७५ आशांपैकी वरील तक्ता अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण ५८० आशा कार्यरत असून ९५ आशा सद्यस्थितीत रिक्त आहेत.

तक्ता ब

अ. क्र.	**कालावधी**	**आशांची संख्या**	**सेवाजेष्ठतेप्रमाणे प्रति माहे मानधन**	**वर्षाभराकरीता महानगरपालिके मार्फत मानधन (एप्रिल २०२६ ते मार्च २०२७)**
१	० ते ३ वर्ष पूर्ण झालेल्या तसेच रिक्त आशा	३४३+ ९५ =४३८	२०००	३४३ X २००० X १२ = ८२,३२,००० ९५ X २००० X १२ = २२,८०,००० एकूण = १०,५१,२०००/-
२	३ ते ६ वर्ष पूर्ण झालेल्या आशा	१०५	३५००	१०५X ३५०० X १२ = ४४,१०,०००/-
३	६ ते ९ वर्ष पूर्ण झालेल्या आशा	६९	४०००	६९ X ४००० X १२ = ३३,१२,०००/-
४	९ वर्षापेक्षा जास्त वर्ष पूर्ण झालेल्या आशा	६३	४५००	६३ X ४५०० X १२ = ३४,०२,०००/-
एकूण		**६७५**	-	**२,१६,३६,०००/-**

वरील तक्ता ब मध्ये नमुद केलेप्रमाणे एकूण ६७५ आशांकरिता एकूण रक्कम रु. २,१६,३६,०००/- इतका खर्च होत असून त्यामधून मागील वर्षाचे रु. ३,८८,६५३/- इतकी रक्कम वजा केल्यास रु. २,१२,४७,३४७/- विभागास अपेक्षित आहे.सदर आशा वर्कर यांना शासनाकडून मानधन दिले जाते तरीही संबंधीतास वेगळयाने मानधन महानगरपालिका फंडातून दिले जात आहे.सदर बाब वित्तीय औचीत्याच्या सुत्रास धरुन नाही.

तरी सदरच्या विषयास मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरी मिळाल्यास सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात **NUHM कर्मचारी वेतन व आशा प्रोत्साहन भत्ता** या लेखाशिर्षाखाली रु. ३,५०,००,०००/- इतकी मुळ तरतुद करण्यात आली आहे. सदरचा खर्च या लेखाशिर्षातून महानगरपालिकेच्या निधीतून भागविता येईल. तरी वर नमुद केल्यानुसार वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता येणाऱ्या रु.२,१२,४७,३४७/- या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे

ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागात एकूण ६७५ पैकी एकूण ५८० आशा कार्यरत असून ९५ आशा सद्यस्थितीत रिक्त आहेत. सदर आशांना शासनामार्फत कामावर आधारित मोबदला हा कमी प्रमाणात येत असल्याने त्यांना आर्थिक मदत म्हणून महानगरपालिका त्यांच्या सेवाजेष्ठतेप्रमाणे वरील तक्यात नमूद मानधन व मानधनाकामी होणारी रक्कम महानगरपालिकेकडून वैद्यकिय विभागाच्या एन.यु.एच.एम विभागास देणेकामी आजची सभा प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या ६४ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर अग्निशमन व जीव संरक्षक वाहनाचे CSMC कराराचे हस्तांतरण करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता अतिमहत्वाचे अत्यावश्यक ६४ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर खरेदी करणे बाबत नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली असून त्यास अनुसरून मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. जर्मनी या पात्रताधारक कंपनीशी करारनामा करुन लेटर ऑफ क्रेडिट करण्यात आले आहे. सदर टर्न टेबल लॅडर वाहनाचे खरेदी बाबत अद्यापपर्यंत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१)	कामाचे नाव	:-	अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता ६४ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर अग्निशमन व जीव संरक्षक वाहन खरेदी करणे बाबत.
२)	प्रशासकीय मंजूरी	:-	प्रशासकीय ठराव क्रं. १४६५, दिनांक २९/०८/२०२३ अन्वये मान्यता
३)	अंदाजपत्रकीय तरतुद	:-	रु. १७,८४,६७,८२७/-
४)	ई-निविदा सुचना व प्रारुप निविदा संच अंतीम करणा-या प्राधिका-याचे नाव	:-	मा. आयुक्त तथा प्रशासक
५)	ई-निविदा प्रसिध्दी दिनांक	:-	दिनांक २३/०८/२०१८
६)	वृत्तपत्राचे नाव	:-	दै. सकाळ, नवभारत, जागरुक टाईम्स, मिड डे, आपला वार्ताहार, दि इकॉनॉमिक्स टाईम्स, दै. नरविर चिमाजी
७)	निविदा पूर्व बैठक	:-	दिनांक ११/०९/२०१८
८)	प्रथम मुदतवाढ	:-	दिनांक १९/०९/२०१८ ते दिनांक २७/०९/२०१८
९)	व्दितीय मुदतवाढ	:-	दिनांक २९/०९/२०१८ ते दिनांक ०८/१०/२०१८
१०)	प्राप्त ई-निविदा संच	:-	दोन (०२)
११)	प्रथम लखोटा उघडणेचा दिनांक	:-	दिनांक १७/११/२०१८
१२)	निविदा समिती समोर सादर दिनांक	:-	दिनांक १८/१२/२०१८
१३)	व्दितीय लखोटा उघडणेचा दिनांक	:-	दिनांक २१/१२/२०१८
१४)	निविदा समितीच्या बैठकीत चर्चा	:-	दिनांक २९/१२/२०१८ व दिनांक १०/०७/२०१९
१५)	प्रथम वाटाघाटी दिनांक	:-	दिनांक १०/०७/२०१९
१६)	व्दितीय वाटाघाटी दिनांक	:-	दिनांक १९/०७/२०१९
१७)	निविदा समितीचे इतिवृत्त	:-	दिनांक ३१/१२/२०१९

१८)	संविदा मंजुरी	:-	दिनांक मा. स्थायी समिती सभा ठराव क्रं. ५५८ दि. १४/०२/२०२०
१९)	ॲग्रिमेंट ड्राफ्ट ची विधी विभागाकडून तपासणी	:-	दिनांक ०६/०३/२०२०
२०)	खरेदी पत्र (Purchase Order)	:-	दिनांक ०९/०३/२०२०
२१)	बँक गॅरंटी	:-	दिनांक २९/०६/२०२०
२२)	करारनामा बाबत विधी विभागाचा स्वयंस्पष्ट अभिप्राय	:-	दिनांक ०६/१०/२०२०
२३)	मा. स्थायी समिती सभा प्रशासकीय ठराव क्रं. ५५८ दि. १४/०२/२०२० मध्ये सुधारणा	:-	प्रशासकीय ठराव क्रं. १७६ दिनांक २७/१०/२०२०
२४)	करारनामा	:-	दिनांक २३/१२/२०२०
२५)	लेटर ऑफ क्रेडिट	:-	दिनांक २०/१२/२०२१
२६)	मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांचे प्रथम मुदतवाढ मिळणे बाबत पत्र	:-	दिनांक २४/०८/२०२२
२७)	वाहनाचा प्रथम तांत्रिक तपासणी कालावधी	:-	दिनांक ०३/११/२०२२ ते १०/११/२०२२
२८)	प्रथम मुदतवाढी बाबत विधी विभागाचा अभिप्राय	:-	दिनांक २१/१२/२०२२
२९)	मा. आयुक्त सो. यांचे इंडियन बँकेस मुदतवाढ करणे बाबतचे पत्र	:-	दिनांक ०३/०१/२०२३
३०)	मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांचे व्दितीय मुदतवाढ मिळणे बाबत पत्र	:-	दिनांक २७/१०/२०२३
३१)	मा. आयुक्त सो. यांचे इंडियन बँकेस मुदतवाढी बाबतचे पत्र	:-	दिनांक १६/०२/२०२४
३२)	मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांचे तृतीय मुदतवाढ मिळणे बाबत पत्र	:-	दिनांक ०७/०५/२०२४
३३)	मा. आयुक्त सो. यांचे इंडियन बँकेस मुदतवाढी बाबतचे पत्र	:-	दिनांक १४/०५/२०२४
३४)	मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांचे चतुर्थ मुदतवाढ मिळणे बाबत पत्र	:-	दिनांक २७/०६/२०२४
३५)	मा. आयुक्त सो. यांचे इंडियन बँकेस मुदतवाढी बाबतचे पत्र	:-	दिनांक १२/०७/२०२४
३६)	मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांचेकडील प्राप्त झालेला स्वीफ्ट मॅसेज.		दिनांक २७/०८/२०२४
३७)	टर्न टेबल लॅडर वाहनाची लेटर ऑफ क्रेडिट मधील ९० % देयक रक्कम मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. जर्मनी कंपनीस अदा	:-	दिनांक १०/०९/२०२४

३८)	टर्न टेबल लॅडर वाहन मुंबई पोर्टवर पोहचले	:-	दिनांक १५/०९/२०२४
३९)	टर्न टेबल लॅडर वाहनाचा पुरवठा	:-	दिनांक ११/१०/२०२४

मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. कंपनीमार्फत सदर टर्न टेबल लॅडर वाहनाचा पुरवठा मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथे दिनांक ११/१०/२०२४ रोजी केलेला आहे तसेच मे. मॅगिरस जी.एम.बी.एच यांनी टर्न टेबल लॅडर वाहनाची ई-निविदा सादर करतांना मे. जोसेफ लेस्ली अॅण्ड़ कंपनी एल एल पी हे भारतातील अधिकृत विक्रेते आणि सेवा भागीदार म्हणून सदर कंपनीची नियुक्ती केली होती सदर वाहन पुरवठा केल्यानंतर २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर ३ वर्ष कालावधीसाठी CSMC साठीचा करार मे. जोसेफ लेस्ली अॅण्ड़ कंपनी एल एल पी या कंपनीसोबत करण्यात येईल असे ई-निविदेमध्ये नमूद केले होते त्याप्रमाणे करारनामा करुन महापालिकेमार्फत ठराव करण्यात आला आहे.

परंतू मे. मॅगिरस जी.एम.बी.एच. यांनी टिपणीमधील संदर्भिय पत्र क्रं. ४ अन्वये कळविले आहे की, दिनांक ०१/०४/२०२३ पासून मे. मॅगिरस जी.एम.बी.एच ने मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. या कंपनीस भारतासाठी अधिकृत विक्री आणि सेवा भागीदार म्हणून नियुक्त केले आहे. मे. जोसेफ लेस्ली अॅण्ड़ कंपनी एल एल पी आणि मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचेतील व्यवसाय पुनर्रचनेमुळे मे. मॅगिरस जी.एम.बी.एच कंपनीने मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. कंपनीला मे. जोसेफ लेस्ली अॅण्ड़ कंपनी एल एल पी कडून चालू असलेले सर्व सेवा करार ताब्यात घेण्यास आणि भारतातील त्यांचे सर्व ग्राहकांना आवश्यक सहाय प्रदान करण्यासाठी प्राधिकृत केले आहे. तसेच मे. मॅगिरस जी.एम.बी.एच यांनी टर्न टेबल लॅडर वाहन पुरवठा केल्यानंतर २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर ३ वर्ष कालावधीसाठी CSMC साठीचा करार मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचे सोबत करणेकामी विनंती केली आहे. संदर्भिय पत्रासोबत मे. मॅगिरस जी.एम.बी.एच व मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचेमधे झालेला सामंजस्य करार व अधिकार पत्राची प्रत जोडली आहे.

उपरोक्त अन्वये नमूद वस्तुस्थिती विचारात घेता ६४ मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहनाचे CSMC साठीचा करार मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचे सोबत करणे बाबत अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे मत आहे. तसेच सदर CSMC कराराचे हस्तांतरण बाबत विधी विभागा मार्फत अभिप्राय घेणे उचित वाटते.

त्यानुसार अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता ६४ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर अग्निशमन व जीवसंरक्षक वाहनाचे CSMC कराराचे हस्तांतरण बाबत विधी विभागामार्फत अभिप्राय प्राप्त झाला असून ६४ मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहनाचे CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) करणे साठीचा करारनामा मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. मुंबई यांचे सोबत करणे बाबत महानगरपालिकेची मंजुरी घेऊन तसा ठराव पारित करणे आवश्यक आहे त्यानुसार विभागामार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करणे उचित ठरेल असे विधी विभागाने कळविले आहे.

तसेच टिपणीमधील संदर्भिय पत्र क्रं. ५ अन्वये मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांनी कळविले आहे की, सदर ६४ मी. TTL पुरवठा करणे कामी आम्ही सन २०१८ मध्ये ई-निविदा भरली होती आणि CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) चे दर त्या वेळी प्रचलित असलेल्या युरो विनिमय दरावर आधारित होते. टेंडर नियमानुसार कार्यादेश दिल्यानंतर लगेचच CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) खरेदी आदेश देणे अपेक्षित होते. परंतु सदर निविदा प्रक्रियेस बराच कालावधी गेल्यामुळे आजच्या युरो विनिमय दरातील चढउतार लक्षात घेऊन या पत्राच्या तारखेपासून एक महिन्याच्या पुढे आम्ही CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) साठी समान किमती ठेवू शकत नाही असे कळविले आहे.

मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. कंपनीने टर्न टेबल लॅडर वाहनाचा पुरवठा दिनांक ११/१०/२०२४ रोजी केला आहे. त्यानुसार दिनांक ११/१०/२०२६ रोजी २४ महिने वॉरंटी कालावधी संपणार आहे. दिनांक ११/१०/२०२६ रोजी २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचे सोबत पुढील ३ वर्ष कालावधीसाठी CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) करणेस तसेच सदर कामी येणा-या रक्कम रु.

१,३५,८९,८२२/- खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.महासभेपूढे ठेवणेस शिफारस आहे.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या ६४ मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहन मे. मॅगिरस जी.एम.बी.एच जर्मनी यांचेकडून खरेदी करण्यात आलेले आहे. मे. मॅगिरस जी.एम.बी.एच यांनी टर्न टेबल लॅडर वाहनाची ई-निविदा सादर करतांना मे. जोसेफ लेस्ली ॲण्ड़ कंपनी एल एल पी हे भारतातील अधिकृत विक्रेते आणि सेवा भागीदार म्हणून सदर कंपनीची नियुक्ती केली होती व वाहनाचा पुरवठा केल्यानंतर २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ३ वर्ष कालावधीसाठी CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) करीता मे. जोसेफ लेस्ली ॲण्ड़ कंपनी एल एल पी यांची नियुक्ती केली होती. परंतु मे. मॅगिरस जी.एम.बी.एच कंपनीने मे. जोसेफ लेस्ली ॲण्ड़ कंपनी एल एल पी या कंपनी ऐवजी मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांना भारतासाठी अधिकृत विक्री आणि सेवा भागीदार म्हणून नियुक्त केले आहे. सदर कंपनीने टर्न टेबल लॅडर वाहनाचा पुरवठा दिनांक ११/१०/२०२४ रोजी केला आहे. त्यानुसार दिनांक ११/१०/२०२६ रोजी २४ महिने वॉरंटी कालावधी संपणार आहे. दिनांक ११/१०/२०२६ रोजी २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर मे. युनिकेअर इमरजन्सी इक्विपमेंट प्रा.लि. यांचे सोबत पुढील ३ वर्ष कालावधीसाठी CSMC (Comprehensive Service Maintenance Contract) करणे करीता मान्यता देण्यात येत आहे तसेच सदर कामी येणा-या रक्कम रु. १,३५,८९,८२२/- खर्चास आजची सभा प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पारीस

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांची बायोमॅट्रीक सर्वेक्षण करुन नोंदणी करणे व फेरीवाल्यांना ओळख पत्र तयार करुन देणे करीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर- प्रस्तावनेचा मजकूर उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्थिर अन्य फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक पध्दतीने सर्वेक्षण करणे गरजेचे आहे शहरी फेरीवाल्यांना बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करुन त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाईल त्या अनुषंगाने शहरी फेरीवाल्यांचे संरक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहर फेरीवाला आराखडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा अधिक विकास करणे जेणेकरून विक्रीसाठी नागरी नियोजन तसेच फेरीवाल्याला व्यवसायासाठी जागा उपलब्ध करणे गरजेचे होईल.

मा. सचिव नगर विकास विभाग यांचे दिनांक ०२/०३/२००९ चे पत्र मा. सर्वोच्य न्यायालयाच्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही उपाययोजना करणेबाबतचे केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियन (National urban livelihoods mission) व राज्य शासन पुरस्कृत राज्य नागरी उपजीविका अभियानाची (State urban livehoods mission) राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचे दिनाक २८/०८/२०१४ चे पत्रातील भाग १ राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील उपांग ०५ नुसार फेरीवाल्याना सहाय्य देणेबाबत नमूद केलेले आहे.

फेरीवाल्यांना मुलभूत बँकीग सेवा मिळण्याच्या दृष्टीने प्रोत्साहीत करणे व खेळते भांडवल उपलब्ध करण्याच्या दृष्टीने संबंधीतांना बँकेकडून क्रेडीट कार्ड उपलब्ध करुन देणे अशी बाब नमुद आहे या बाबींचा विचार करता मनपा हद्दीतील सर्व फेरीवाल्यांचा बायोमेट्रीक पध्दतीने सर्व्हेक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणा नुसार मनपा हद्दीतील स्थिर व अस्थिर फेरीवाल्यांचे २०१४ च्या सर्वेक्षणाअंती एकुण संख्या १५२१५ एवढी आहे.

पथविक्रेता समितीची रचना पुढील प्रमाणे.

अ.क्र.	शासकीय विभाग व इतर मंडळे	सदस्य संख्या	निवडलेले सदस्य	रिक्त सदस्य पदे	शेरा
१२.	महानगरपालिका आयुक्त अध्यक्ष	०१	०१		
१३.	पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक	०१	०१		
१४.	विशेष नियोजन प्राधिकरणाचे कार्यकारी प्रमुख किंवा प्रतिनिधी	०१	०१		
१५.	पोलीस सहआयुक्त किंवा पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस अधीक्षक (वाहतूक-प्रभारी अधिकारी)	०१	०१		
१६.	कार्यकारी आरोग्य अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी	०१	०१		
१७.	अग्रणी बँकेचा प्रतिनिधी	०१	०१		
	ख. इतर मंडळे	०८			
१८.	पथ विक्रेते (यापैकी ६. अनुसूचित जाती ७. अनुसूचित जमाती ८. इतर मागास वर्ग	 ०१ ०१ ०१	 ०१ - ०१	०१	

	९. अल्पसंख्याक १०. विकलांग व्यक्ती) च्या योग्य प्रतिनिधित्वासह एक तृतीयांश महिला विक्रेत्या असतील)	०१ ०४	- ०३	०१ ०१	
१९.	अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना	०२	प्राप्त प्रस्ताव २	०२	दि. २५/०६/२०२६ जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. अर्ज मागविण्यात आले होते.
२०.	निवासी कल्याण संघ	०२	प्राप्त प्रस्ताव १	०२	
२१.	व्यापारी संघाचा प्रतिनिधी	०१	०	०१	
२२.	पणन संघाचा प्रतिनिधी	०१	०	०१	
	एकूण..	२०	११	९	

विविध संघटना, लोकप्रतिनिधी व पदधिकारी यांनी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे फेरीवाला झोन तयार करणे सर्वेक्षण प्रणालीचा वापर करणे फेरीवाल्यांना ओळखपत्र देणे व इतर अनुषंगिक बाबींची मागणी प्रशासनाकडे केलेली आहे.

सर्व बाबींचा विचार करता, वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्थिर व अस्थिर पथविक्रेत्यांचे नव्याने बायोमेट्रिक पद्धतीने सर्वेक्षण करून प्राप्त होणारी पथविक्रेत्यांची यादी नियमानुसार प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना मागविणे व प्राप्त हरकती/सूचनांवर विहित प्रक्रियेनुसार कार्यवाही करणे तसेच पथविक्रेत्यांसाठी आवश्यक त्या ठिकाणी पथविक्रेता फेरीवाला नाफेरीवाला क्षेत्र निश्चित करणे, पथविक्रेत्यांची नोंदणी करणे, सर्वेक्षणातील माहितीचे संगणकीकरण करणे, पथविक्रेत्यांना संगणकीकृत ओळखपत्र उपलब्ध करून देणे तसेच पुढील नियमानुसार आवश्यक कार्यवाही करणे या बाबींनकरीता सदर प्रस्तावास महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे यासाठी अंदाजे रु. ५० लक्ष (अक्षरी पन्नास लक्ष) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यास महासभेस मान्यतेस्तव सादर.

ठराव / निर्णय :- सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली, त्यानुसार राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांची बायोमॅट्रीक सर्वेक्षण करुन नोंदणी करणे व फेरीवाल्यांना ओळख पत्र तयार करुन देणे करीता रु. ५० लक्ष इतक्या खर्चास आजची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २४ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वायू प्रदूषण नियंत्रण व धूळ प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी करावयाच्या दंडात्मक कार्यवाहीला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत विविध बांधकाम, पाडकाम, रस्ते, पूल, पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच Construction & Demolition (C&D) Waste Management संबंधी कामांमुळे निर्माण होणारे धूळ व वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे SMPIL क्र. ०३/२०२३ मधील आदेश, उच्चस्तरीय समिती (High Power Committee – HPC) यांचे निर्देश, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्या मार्गदर्शक सूचना तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या Air Pollution Mitigation Guidelines यांच्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील संबंधित कामांसाठी "वायू प्रदूषण नियंत्रण व धूळ प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP)" तयार करण्यात येत आहे.

सदर SOP मध्ये बांधकाम व पाडकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रण, साहित्याची वाहतूक, रस्ते व परिसराची स्वच्छता, पाण्याची फवारणी, C&D Waste व्यवस्थापन, नियमित तपासणी, उल्लंघन झाल्यास कार्यवाही, डिजिटल दस्तऐवजीकरण व अनुपालन अहवाल इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या नगररचना विभाग व प्रभाग समिती स्तरावर सहाय्यक आयुक्त यांचे माध्यमातून सदर कार्यवाही करण्यात येणार आहे. याकरीता Ward Level Air Mitigation Squad तयार करण्यात येणार आहे. PM१० व PM२.५ स्वरूपातील धूळ प्रदूषण कमी करण्यास तसेच संबंधित प्रकल्पांकडून पर्यावरणीय नियमांचे पालन सुनिश्चित करण्यास मदत होईल.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या बांधकामांदरम्यान वायू प्रदूषण नियंत्रणाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन, बांधकाम साहित्य/मलबा सार्वजनिक ठिकाणी ठेवणे, वाहनांमुळे रस्त्यावर माती व चिखल पसरणे तसेच रस्ते, पदपथ, नाले व इतर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याच्या बाबी निदर्शनास येतात.

वायू प्रदूषण वाढण्यासोबतच महानगरपालिकेवर स्वच्छता, दुरुस्ती व देखभालीचा अतिरिक्त आर्थिक भार पडतो. त्यामुळे बांधकाम परवानगी देताना संबंधित मालक/विकासकाकडून खालीलप्रमाणे Security Deposit (सुरक्षा अनामत रक्कम) घेणे उचित ठरेल.

अ.क्र.	मंजूर एकूण बांधकाम क्षेत्रफळ	प्रस्तावित सुरक्षा अनामत
१	५०० चौ.मी. पर्यंत	निरंक
२	५०० चौ. मी. पेक्षा अधिक ते २,००० चौ.मी. पर्यंत	₹१,००,०००/-
३	२००० चौ. मी. पेक्षा अधिक ते ५,००० चौ.मी. पर्यंत	रु.२,५०,०००/-
४	५००० चौ. मी. पेक्षा अधिक ते १०,००० चौ.मी. पर्यंत	रु.५,००,०००/-
५	१०,००० चौ. मी. पेक्षा अधिक ते २०,००० चौ.मी. पर्यंत	रु.७,५०,०००/-
६	२०,००० चौ. मी. पेक्षा अधिक असल्यास	रु.७,५०,०००/- + (प्रत्येकी ५,००० चौ.मी. साठी रु.२,५०,०००/-)
७	Ready Mix Concrete Plants	रु. ३,००,०००/-

यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित बांधकाम व पायाभूत सुविधा प्रकल्पांची नियमित तपासणी करून धूळ प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होईल. तसेच नियमांचे उल्लंघन आढळल्यास प्रचलित नियमांनुसार आवश्यक प्रशासकीय/दंडात्मक कार्यवाही करणे सुलभ होईल.

नियमांचे उल्लंघन केल्यास खालीलप्रमाणे Intimation Notice, Show Cause Notice व Stop Work Notice जारी करण्यात येणार आहे. त्यानुसार उल्लंघनाबाबत घ्यावयाची नुकसानभरपाई पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

अ.क्र.	भूखंड / बांधकाम क्षेत्र	पर्यावरणीय नुकसानभरपाई (प्रथम उल्लघंन) Ward Level Air Pollution Mitigation Squad	पर्यावरणीय नुकसानभरपाई (द्वितीय उल्लघंन) Ward Level Air Pollution Mitigation Squad	पर्यावरणीय नुकसानभरपाई (तृतीय उल्लघंन) नगररचना विभाग
१	बांधकाम क्षेत्र (BUA) २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त	रु. २,५०,०००/-	₹५,००,०००/-	Stop Work
२	भूखंड क्षेत्र ५०० चौ.मी. पेक्षा जास्त ते २०,००० चौ.मी. पर्यंत	रु. २५,०००/-	₹५०,०००/-	Stop Work
३	भूखंड क्षेत्र २०० चौ.मी. पेक्षा जास्त ते ५०० चौ.मी. पर्यंत	रु. १५,०००/-	₹३०,०००/-	Stop Work
४	भूखंड क्षेत्र १०० चौ.मी. पेक्षा जास्त ते २०० चौ.मी. पर्यंत	रु. १०,०००/-	₹२०,०००/-	Stop Work
५	भूखंड क्षेत्र १०० चौ.मी. पर्यंत	रु. ५,०००/-	₹१०,०००/-	Stop Work
६	Ready Mix Concrete Plants	रु. १,५०,०००/-	₹३,००,०००/-	Stop Work

तसेच, बांधकाम साहित्य व ढिगाऱ्यांची वाहतूक या आधारे पर्यावरणीय नुकसानभरपाई (Environmental Compensation - EC) निश्चित करण्याची प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ.क्र.	उल्लंघनाचा प्रकार	पर्यावरणीय नुकसान भरपाई (EC)
१	कचरा, प्लास्टिक कचरा, जैविक अवशेष (Biomass) किंवा बागेतील कचरा उघड्यावर जाळणे	₹५,०००/-
२	सार्वजनिक रस्ता, सार्वजनिक जागा, रिकामी जमीन किंवा नदीच्या पूरक्षेत्रामध्ये (Flood Plain) १०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रात बांधकाम व पाडकाम (C&D) कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणे	₹२५,०००/-
३	सार्वजनिक रस्ता, सार्वजनिक जागा, रिकामी जमीन किंवा नदीच्या पूरक्षेत्रामध्ये १०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रात बांधकाम व पाडकाम (C&D) कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणे	₹१०,०००/-
४	बांधकाम साहित्य किंवा मलबा (Debris) वाहून नेणारे ट्रक किंवा इतर वाहने योग्य प्रकारे झाकलेली (Covered) नसणे	₹५,०००/-
६ या	सार्वजनिक रस्ते किंवा रिकाम्या जागांवर कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावून धूळ प्रदूषण निर्माण करणे	₹५,०००/-
७	बांधकाम साहित्याचा साठा व विक्री करणारी दुकाने आवश्यक संरक्षणात्मक आच्छादन (Adequate Cover) न ठेवता साहित्य साठविणे	₹५,०००/-

यामध्ये, दरवर्षी १५ ऑक्टोबर ते ३१ जानेवारी या कालावधीत वातावरणातील हवेच्या गुणवत्तेमध्ये होणारी लक्षणीय घसरण विचारात घेता, या कालावधीत वरीलपैकी कोणतेही उल्लंघन आढळल्यास संबंधित पर्यावरणीय नुकसानभरपाई (Environmental Compensation - EC) दुप्पट दराने वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.
वरीलप्रमाणे प्रस्तावित दंड वसूली करीता मान्यतेसाठी मा. महासभेसमोर ठेवणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित दंड वसूली करीता प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव / निर्णय :- पर्यावरण विभागाच्या वायू प्रदूषण नियंत्रण व धूळ प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी करावयाच्या दंडात्मक कार्यवाहीला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत या विषयाचे वाचन सभागृहात करणेत आले. त्याअनुषंगाने २,००० चौ.मी. पेक्षा अधिक ते ५,००० चौ.मी. पर्यंत व ५,००० चौ.मी. पेक्षा अधिक ते १०,००० चौ.मी. पर्यंत यांची अनामत रक्कम १ लक्ष करावी व १०००० चौ.मी. पेक्षा अधिक ते २०००० चौ.मी. पर्यंत २.५ लक्ष इतकी करण्यात यावी. तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास ज्याचे बांधकाम क्षेत्र (BUA) २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे अशा बाबत प्रथम उल्लंघन रु.१ लक्ष व द्वितीय उल्लंघन रु.२.५ लक्ष अशी सुधारणा करावी व उर्वरित बाबींना प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे वित्तीय अधिकार वाढविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ हि दि.१५ जानेवारी, २०२६ रोजी पार पडून २९ वॉर्डचे मिळून ११५ नगरसेवक नव्याने नियुक्त झालेले आहेत. तद्नंतर महानगरपालिकेच्या दि.२० फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर स्थायी समितीच्या स्थापनेनंतर स्थायी समिती सभापती निवड करण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम, २००७ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली सभापती पदाची निवड करण्यात येते. त्यानुसार या अनुषंगाने जा.क्र.व.वि.श.म.स.का./११८/२०२६ अन्वये दि.२०/०२/२०२६ रोजी मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना स्थायी समिती सभापती निवडीसाठी तारीख व वेळ मिळणेबाबत कळविणेत आले होते. त्या अनुषंगाने दि.०५/०३/२०२६ रोजी डॉ.इंदुराणी जाखड, जिल्हाधिकारी पालघर यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापती निवड करण्यात आली.

वसई-विरार शहर महानगरपालिका मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४, दि.२०/०९/२०१० अन्वये ७५ लाख पर्यंतचे प्रशासकीय अधिकार मा.स्थायी समितीस प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे ७५ लाखाखालील सर्व विषय मा.स्थायी समितीच्या संमत्तीने मंजूर करण्यात येतात. ७५ लाखावरील सर्व विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी येत आहेत. मा.सर्वसाधारण सभा हि महिन्यातून एकदाच होत असते त्यामुळे ७५ लाखावरील विषयांवर निर्णय घेण्यासाठीच्या प्रक्रियेला जास्त वेळ लागतो. परिणामी नागरी सुविधांची कामे विहित वेळेत पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. नागरिकांना दर्जेदार सुविधा वेळेत पुरवण्याच्या दृष्टीने आणि निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी मा.स्थायी समितीच्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारात वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरची बाब हि धोरणात्मक बाब असल्यामुळे सदर विषयास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे वित्तीय अधिकार ७५ लाखांवरून २ कोटींपर्यंत वाढविणेबाबत मंजुरी मिळणेत्सव प्रस्ताव सादर.

ठराव / निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४, दि. २०/०९/२०१० मधील तरतुदीत सुधारणा करून, महापालिका क्षेत्रातील विकास कामांना व विविध प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे मा. स्थायी समितीचे वित्तीय अधिकार रक्कम रु. ७५ लाख (अक्षरी रुपये पंचाहत्तर लाख) वरून वाढवून रक्कम रु.२ कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी) पर्यंत करणेस मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - रंजना पाटेकर

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २६ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात करावयाच्या विकास कामांसाठी प्रभाग समितीकडे असलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकार मा.स्थायी समितीकडे प्रदान करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ हि दि.१५ जानेवारी, २०२६ रोजी पार पडून २९ वॉर्डचे मिळून ११५ नगरसेवक नव्याने नियुक्त झालेले आहेत. तद्नंतर महानगरपालिकेच्या दि.२० मार्च, २०२६ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०३ नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २९ अन्वये प्रभाग समित्यांच्या रचनाही करण्यात आलेल्या आहेत. सदर रचनेनुसार प्रभाग समित्यांच्या सभापतीची निवड करण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम, २००७ चे नियम क्र.४ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली सभापती पदाची निवड करण्यात येते. या अनुषंगाने जा.क्र.व.वि.श.म.सचिव/१६४/२०२६ अन्वये दि.२३/०३/२०२६ रोजी मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना प्रभाग समिती सभापती निवडीसाठी तारीख व वेळ मिळणेबाबत कळविणेत आले होते. परंतु अद्यापपर्यंत प्रभाग समिती सभापती निवडीसाठी पीठासीन अधिकारी यांची तारीख व वेळ न मिळाल्यामुळे प्रभाग समिती सभापती पदाची निवड होऊ शकली नाही. परिणामी प्रभाग समित्यांचे कामकाज अद्याप सुरु झालेले नाही.

प्रभाग समिती सभापतींची निवड होईपर्यंत कलम २९-अ (७) क चे अधिकार मा.स्थायी समितीला सुपूर्त करणे योग्य होईल. सदर बाबत मा.महापौर महोदय व इतर पदाधिकारी यांनी तत्वता संमती दर्शविली आहे. परंतु सदरची बाब हि धोरणात्मक बाब असल्यामुळे सदर विषयास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

तरी प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात करावयाच्या विकास कामांसाठी प्रभाग समितीकडे असलेले प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचे अधिकार संबंधित प्रभागाचे प्रभाग समिती सभापती नियुक्त होईपर्यंत मा.स्थायी समितीला प्रदान करणेस मंजुरी मिळणेत्सव सादर.

ठराव / निर्णय :- मा.अतिरिक्त आयुक्त यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे सभागृहात वाचन करणेत आले. सदर प्रस्तावावर सभागृहात चर्चा करणेत आली. चर्चेअंती प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात करावयाच्या विकास कामांसाठी प्रभाग समितीकडे असलेले महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ (७) क चे अधिकार मा.स्थायी समितीकडे प्रदान करणेबाबतच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २७ सभा सुचना क्र. ११ दिनांक : ३१/०८/२०२६

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मा. नगरसेवकांना कार्यालयीन कामकाजासाठी टॅब (Tab) खरेदी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे. येत असून त्यांवर सभेत विचार व निर्णय घेण्यात येईल. अनुसूची 'डी मधील नियमांना अधिनियमाचा भाग मानले जाते.

प्रस्तावाचा मजकूर - वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासनातील कार्यक्षमता, पारदर्शकता व गतिमानता वाढविण्याच्या दृष्टीने विविध डिजिटल प्रणालींचा वापर करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये होणाऱ्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, समित्यांच्या सभा व इतर बैठकीसाठी आवश्यक असणारी सभा विषयपत्रिका, ठराव, प्रस्ताव, अहवाल, परिपत्रके, शासन निर्णय व इतर संबंधित कागदपत्रे डिजिटल स्वरूपात नगरसेवकांना उपलब्ध करून दिल्यास कागदाचा वापर कमी होऊन कागदपत्रांच्या छपाईवरील खर्चात बचत होण्यास मदत होईल. तसेच सदर कागदपत्रे वेळेत व सुलभरीत्या उपलब्ध करून देता येणे शक्य होईल.

याकरीता महानगरपालिकेच्या सभागृहातील कामकाज, विविध बैठका, समिती सभा तसेच महानगरपालिकेशी संबंधित आवश्यक कागदपत्रे व माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी नगरसेवकांना टॅबलेट संगणक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या नगरसेवकांना तसेच भविष्यात येणाऱ्या नगरसेवकांना महानगरपालिकेच्या डिजिटल कामकाजाशी प्रभावीपणे जोडण्यासाठी व सभागृहाच्या कामकाजासाठी आवश्यक डिजिटल कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने टॅब खरेदी करणे उचित राहील. सदर खरेदी केलेल्या टॅब मुळे खालीलप्रमाणे फायदे होऊ शकतात.

१. महासभा व समित्यांचे अजेंडा, इतिवृत्त व सर्व कागदपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध होतील.
२. कागदाचा वापर व मुद्रण खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होईल.
३. ई-मेल, डिजिटल फाईल्स व ऑनलाइन बैठका अधिक प्रभावीपणे हाताळता येतील.
४. महानगरपालिकेच्या डिजिटल प्रशासनाला चालना मिळेल.

तरी सदर टॅब खरेदी करणेकामी येणाऱ्या अंदाजीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	साहित्य	नग	प्रति नग अंदाजीत रक्कम रु (सर्व करांसहीत)	एकूण अंदाजीत रक्कम रु. (सर्व करांसहीत)
१	• Display- ११" inch or above • Processor – A १६ or equivalent • Storage – २५६ GB • Connectivity – Wifi + cellular (४G/५G) compatible • OS- OEM Supported Warranty – १ year OEM	१२५	७९,९००/-	९९,८७,५००/-
एकुण				९९,८७,५००/-

उक्त प्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मा. नगरसेवकांसाठी कार्यालयीन कामकाजाकरिता वरील किमान तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार १२५ टॅब खरेदी करण्यास अंदाजीत रक्कम रु. ९९,८७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२०१, "संगणक साहित्य खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

प्रस्तावाचा निर्णय - सदर बाबत सभागृहात चर्चा करणेत आली. तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मा. नगरसेवकांसाठी कार्यालयीन कामकाजाकरिता १२५ टॅब खरेदी करणेकामी व होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. ९९,८७,५००/- (सर्व करांसहीत) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - रंजना शेलार

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २८ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील रु. ९५७.६४ कोटींच्या संशयास्पद निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून ती रद्द करण्याबाबत.

ठराव / निर्णय :- सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - अंजना थापेकर

अनुकूल संख्या ---- प्रतिकुल संख्या---- तटस्थ संख्या ----

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार
मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २९ **सभा सुचना क्र. ११** **दिनांक : ३१/०८/२०२६**

विषय :- महानगरपालिकेच्या लिपिक टंकलेखक, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, Software, Hardware व Network), आरोग्य निरीक्षक, अग्निशमन विमोचक (Fire Man), कॉम्पुटर तंत्रज्ञ, विधी अधिकारी, सहाय्यक विधी अधिकारी, आरेखक, सर्वेअर, ट्रेजरर, ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, उद्यान निरीक्षक, सहाय्यक उद्यान अधीक्षक, दूरध्वनी चालक, कक्ष सेवा, कक्ष सेविका, लघु टंकलेखक, अर्धकुशल मनुष्यबळ, वाहन चालक, प्रमुख माळी, तारतंत्री, मजूर, सफाई कामगार, शिपाई इत्यादी संवर्गातील पदे कंत्राटी पद्धती ऐवजी ठोक वेतनावर नियुक्त करणेबाबत.

ठराव / निर्णय :- सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------- प्रतिकुल संख्या---------- तटस्थ संख्या ----------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)